


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१३ ■ सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# भाजप नंबर 1, शिंदे गटही शंभरी पार

## जिल्हा परिषदेतील 500 जागांचा चक्रावणारा निकाल

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी सुरु झाली आहे. १२ जिल्हा परिषदेच्या ७३१ तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी शनिवारी मतदान झालं होतं. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

राज्यातील जिल्हा परिषदेतील ७३१ जिल्हा परिषद सदस्यांपैकी ४८५ जागांचा कल हाती आला आहे. यामध्ये भाजप- १७६, शिवसेना शिंदे गट- १०९, राष्ट्रवादी अजित पवार गट- ९५, काँग्रेस- ४२, शिवसेना ठाकरे गट- २५, राष्ट्रवादी शरद पवार गट- १५, इतर- २५ जागांवर आघाडीवर आहेत. पहिल्या कलानूसार महायुतीने बाजी मारल्याचे दिसून येत आहे.

**महायुतीच्या २७ जागा बिनविरोध**

कोकणात महायुतीच्या तब्बल २७ जागा बिनविरोध जिंकल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या ८, तर पंचायत समितीच्या १७ जागा महायुतीने बिनविरोध जिंकल्या आहेत. ५० सदस्यांच्या सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत भाजपचे ७ आणि शिंदे गटाचा १ सदस्य बिनविरोध विजयी झाला आहे. तर १०० सदस्यसंख्या असलेल्या पंचायत समितीमध्ये भाजपचे १६ आणि शिंदे शिवसेनेचा १ सदस्य बिनविरोध विजयी झाल्याचं समोर आलं आहे. रायगड आणि रत्नागिरीतून शिवसेनेचे दोन उमेदवार बिनविरोध जिंकले आहेत. महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे पंचायत समिती गणातून उभे असलेले अनिल जाधव यांच्या विरोधात असलेल्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशी माघारी घेतल्याने अनिल जाधव हे बिनविरोध निवडून आले आहेत. तर रत्नागिरी जिल्ह्यातील नाणीज पंचायत समिती गणातून शिंदे शिवसेनेच्या उमेदवार डॉ. पद्मजा कांबळे यांची बिनविरोध निवड झाली.

**दुपारी १ वाजेपर्यंतची आकडेवारी**

| | |
|---|---|
| भाजप- | १७६ |
| शिंदे गट- | १०९ |
| अजित पवार गट- | ९५ |
| काँग्रेस- | ४० |
| शिवसेना ठाकरे गट- | २५ |
| शरद पवार गट- | १५ |
| इतर- | २५ |

पुण्याच्या जुन्नरमध्ये जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडेनी थेट लंगोट घालून जल्लोष केला त्यांची सून विजयी झाल्यानंतर त्यांनी हा जल्लोष साजरा केला.




# पुण्याच्या महापौरपदी मंजुषा नागपुरे, उपमहापौरपदी परशुराम वाडेकर

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**पुणे:** महानगरपालिकेत सोमवारी मनपा सभागृहात महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक पार पडली जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यावेळी काम पाहिले. भारतीय जनता पक्षाच्या मंजुषा नागपुरे यांची महापौर पदी बिनविरोध निवड तर उपमहापौरपदी परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आलेली आहे.

तीन सदस्य यांनी पुणे मनपा महापौर पदासाठी अर्ज दाखल केले होते. भारतीय जनता पक्षाकडून मंजुषा नागपुरे, राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाकडून शितल सावंत तर काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज महापौर पदासाठी दाखल केला होता. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शीतल अजय सावंत आणि काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी त्यांची नावे १५ मिनिटांच्या माघारी वेळेत मागे घेतली आहे.

भारतीय जनता पक्षाचे गटनेते गणेश बिडकर यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांशी चर्चा करून संबंधित निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी शिष्टाई केली आणि ती फळाला आली. त्यानंतर मंजुषा नागपुरे यांची महापौरपदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर सभागृहात उपस्थित सदस्यांनी त्यांचे स्वागत केले. उपमहापौर पदासाठी तीन जणांनी सहा अर्ज दाखल केले होते. त्यापैकी अर्ज माघारी मुदतीत अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. उपमहापौर पदासाठी काँग्रेस पक्षाकडून साहिल केदारी यांनी दोन अर्ज दाखल केले. भाजपकडून परशुराम वाडेकर यांनी देखील तीन अर्ज दाखल केले. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केले होते.

# उद्यापासून बारावीच्या परीक्षेला प्रारंभ

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेळापत्रकानुसार बारावीच्या परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरूवात होत आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यात ८७ केंद्र असून २६ हजार २८७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. या परीक्षा केंद्रांमधील २२ संवेदनशील असल्याने यावर शिक्षण विभागाची करडी नजर राहणार आहे.

जिल्ह्यातील तीन तालुक्यामधील केंद्र हे अतिसंवेदनशील म्हणून नोंदविण्यात आले आहे. शिक्षण विभागाची पाच पथके तर जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दोन पथक कार्यान्वित राहणार आहेत. अकोला जिल्ह्यात उद्या होणाऱ्या बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व्हाव्या, याकरिता सर्व महाविद्यालयांना सीसीटीव्ही लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे परीक्षा केंद्र अतिसवेदनशील आहेत त्या ठिकाणी २२ बैठे पथक स्थापन करण्यात आले असून परीक्षा केंद्राच्या शंभर मीटरच्या अंतरावरील सर्व झेरॉक्स मशीन बंद राहणार आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंगळवारी स्वीकारतील पदाची सुत्रे !

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी हा आठवडा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे. या आठवड्यात अजित पवार गटातर्फे विलीनीकरणाबाबत पक्षांतर्गत चर्चा होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे सुनेत्रा पवार या मंगळवारी उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारतील. शपथविधी झाल्यानंतर त्या मंत्रालयात आलेल्या नाहीत. मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठक असल्याने त्या बैठकीला हजर राहण्यासाठी मंत्रालयात येतील. तत्पूर्वी त्या सहाव्या मजल्यावरील उपमुख्यमंत्री दालनात जाऊन आपल्या पदाची सूत्रे घेतील.

सुनेत्रा पवार मुंबईत आल्यानंतर अजित पवार गट विलीनीकरणाबाबत त्यांच्याशी चर्चा करणार आहे. या चर्चेपूर्वी पक्षातील आमदार आणि मंत्र्यांची मते जाणून घेतली जातील, अशीही शक्यता आहे. आमचा पक्ष हा अजित पवार यांचा राजकीय परिवार आहे. परिवारातील सर्व सदस्य विलीनीकरणाबाबत निर्णय घेतील, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी नुकतेच स्पष्ट केले होते.

**विलीनीकरणावर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत चर्चा**



**शरद पवार गटाकडे सर्वांचे लक्ष**

शरद पवार गटाचे आमदार आणि अजित पवार यांचे पुतणे रोहित पवारही या आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन काही गोष्टी समोर आणणार आहेत. प्रामुख्याने अजित पवार यांच्याबरोबर शरद पवार गटाच्या ज्या बैठका झाल्या होत्या, त्या बैठकांना रोहित पवारही उपस्थित होते. अजित पवार यांनी जवळच्या लोकांना आणि मला काही गोष्टी सांगितल्या होत्या, त्यावर मी बोलणार असल्याचे रोहित पवार यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा आठवडा महत्त्वपूर्ण घडामोडींचा आहे.

# आमदाराच्या मुलाने EVM चे बटन दाबले; तीन कर्मचारी निलंबित

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी




**छत्रपती संभाजी नगर :** जिल्ह्यात काल मतदानावेळी घडलेल्या घटनेने चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेचे आमदार विलास भुमरे हे पाचोडमध्ये मतदानाला गेले असताना त्यांचा लहान मुलगाही त्यांच्या सोबत होता. मतदानानंतर आमदार भुमरेंच्या बोटाला शाई लावताना त्यांच्या मुलाच्याही बोटाला मतदान अधिकाऱ्याने गंमत म्हणून शाई लावली. या प्रकरणात आता तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ दरम्यान झालेल्या निवडणूक प्रक्रियेत हलगर्जीपणा झाल्याप्रकरणी पैठण तालुक्यातील पाचोड बु. येथील मतदान केंद्रावरील तीन कर्मचाऱ्यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी दिली आहे. यामध्ये केंद्रप्रमुख दिलीप देवराव नरवडे, सहायक शिक्षक, मतदान अधिकारी क्रमांक ३ संगीता नामदेव केदार, सहायक शिक्षक आणि रेणुका सुरेश बोंबले, होमगार्ड यांचेकडून निवडणुकीसारख्या अतिसंवेदनशील कामकाजात बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशी स्थिती निर्माण होऊ दिल्याने, तसेच आवश्यक ती दक्षता न घेता दिलेल्या प्रशिक्षणानुसार नियमांचे पालन न केल्याने संबंधित तिन्ही कर्मचाऱ्यांचे स्पष्टीकरण अमान्य ठरवून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ कलम १३४ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार त्यांना मतदान समाप्त झाल्याच्या क्षणापासून शासकीय सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले

# सोने तेजीमागे चीनचा हात असल्याचा अमेरिकेचा दावा !

**नवी दिल्ली :** जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतीत होणारा प्रचंड चढ-उतार हा नैसर्गिक नसून तो चीनमधील सट्टेबाजीमुळे होत असल्याचा खळबळजनक दावा अमेरिकेचे कोषागार सचिव स्कॉट बेसेंट यांनी केला आहे.

फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट केले की, चीनमधील ट्रेडर्सवर नियंत्रण मिळवण्यासाठी तिथल्या अटी कडक केल्या जात आहेत, परिणामी सोन्याच्या किमतीत 'क्लासिकल बबल' सारखी स्थिती निर्माण झाली आहे.

बेसेंट यांच्या मते, गेल्या आठवड्यात सोन्याच्या किमतीत झालेली मोठी पडझड ही चीनमधील अस्थिरतेचा परिणाम आहे. चीनमध्ये सोन्याच्या व्यापारासाठी 'मार्जिन'च्या अटी कडक कराव्या लागत आहेत, कारण तिथले ट्रेडर्स मोठ्या प्रमाणावर सट्टेबाजी करत आहेत. 'सोन्यातील ही उसळी केवळ सट्टेबाजीवर आधारीत आहे,' असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. सोन्यातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन डॉलरने जानेवारीनंतर प्रथमच साप्ताहिक झेप घेतली आहे.

# राज्यात महाविकास आघाडी फुटीच्या उंबरठ्यावर !

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मुंबई :** राष्ट्रवादीमधील संभाव्य विलिनीकरणाच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये 'एकला चलो रे'चा सूर उमटत आहे. यासंदर्भात काँग्रेस अधिकृत निर्णय घेणार आहे. राष्ट्रवादीची साथ सोडल्यानंतर काँग्रेस महाविकास आघाडीतूनही बाहेर पडण्याच्या विचारात असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले. त्यामुळे महाविकास आघाडीच्या राजकारणाला धक्का बसण्याची शक्यता आहे. राज्यातील काँग्रेसचे नेते याबाबत लवकरच दिल्लीतील पक्षश्रेष्ठींबरोबर चर्चा करणार असल्याचेही समजते.

राष्ट्रवादीचे विलिनीकरण झाले तर महाविकास आघाडीत काँग्रेस, उद्धवसेना हे प्रमुख पक्ष राहतील. काँग्रेसने महापालिका निवडणुकीत मुंबईत उद्धव सेनेबरोबर युती करण्यास नकार दिला देऊन स्वबळावर निवडणूक लढवली होती. वैचारिक भूमिकेवर ठाम राहणाऱ्या काँग्रेसमध्ये स्वबळावर जाण्याचा सूर महत्त्वाच्या नेत्यांमध्ये उमटत आहे. काँग्रेसमधील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार नुकतीच मुंबईत काँग्रेसची बैठक पार पडली. यावेळी स्वबळाबाबत सूर उमटल्यानंतर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनीही दुजोरा दिल्याचे समजते. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांमध्येही काही दिवसांपासून हाच सूर आहे. काँग्रेसच्या एका नेत्याने याबाबत सांगितले की, 'महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील समन्वयाचा अभाव, निर्णय प्रक्रियेत होणारा विलंब आणि स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये वाढणारी नाराजी याचा थेट फटका पक्षसंघटनेला बसत आहे. स्वबळावर निवडणूक लढवून पक्षाची स्वतंत्र ओळख पुन्हा उभी करण्याचा विचार पक्षात सुरू आहे.' काही महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये काँग्रेसने स्वबळावर उमेदवार उभे केले होते. यातून पक्षाला संमिश्र यश मिळाले.

# शिवनेरी, शिवाई, शिवशाही अन् आता 'राजमाता जिजाऊ' !

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बस दाखल होणार आहेत. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत या बसला 'राजमाता जिजाऊ' असे नाव देण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी, विठाई अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत 'राजमाता जिजाऊ' यांच्या नावाने आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

एसटीच्या राज्यभरातील गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ताफ्यात ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि पांढऱ्या शुभ्र रंगसंगतीत सजलेल्या या बसेस सर्वांनाच आकर्षित करणाऱ्या असणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. स्वराज्य संकल्पनेमागे राजमाता जिजाऊ या प्रेरणाशक्ती आहेत. त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी आहेत. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसेसचे 'राजमाता जिजाऊ' असे नामकरण करण्यात आले आहे.

> 'राजमाता जिजाऊ' हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधीलकीचे एक सन्मानचिन्ह आहे.
> - **प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री

**नवीन एसटी बसचे होणार नामकरण**






सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## कारला ट्रकची धडक; बुलडाण्यातील एक ठार

**बुलडाणा :** सासूरवाडीला भेट देऊन रात्री घराकडे निघालेल्या जावयाच्या कारला ट्रकने धडक दिली. यातच त्यांचा मृत्यू झाल्याची घटना येळगाव-साखळीदरम्यान पैनगंगा नदीच्या पुलाजवळ रविवारी रात्री घडली. महेश कडुबा लोढे (वय ३०) असे मृत तरुणाचे नाव आहे. बुलडाणा तालुक्यातील भादोला येथे सासूरवाडीला भेट दिल्यानंतर महेश आपल्या गावी मेहकर तालुक्यातील मोहदरी येथे कारने (एमएच-२८-बीक्यू-२४१८) मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास जात होते. बुलढाणा ते चिखली मार्गावर साखळी फाट्याच्या अलीकडे पैनगंगा नदीच्या पुलाजवळ भरधाव वेगातील ट्रकने (बीआर-०६-८४१२) कारला धडक दिली. या अपघातात महेश यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती समजताच बुलढाणा ग्रामीण पोलिस घटनास्थळी दाखल झाले. महेश यांचे काका केशव माधवराव लोढे यांच्या फिर्यादीवरून पोलिस हेड कॉन्स्टेबल सुनीता खंडारे यांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# धारणीतील महाविधी शिबिरात शेवटचा घटक आश्वस्त

◆ विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम ◆ ३६ स्टॉलवर शासकीय विभागांची माहिती

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**अमरावती :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणातर्फे धारणी येथे आज महाविधी शिबिर घेण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित न्यायमूर्ती आणि अधिकाऱ्यांनी संविधानाला अभिप्रेत असलेला शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. धारणीतील महाशिबिरही न्यायप्रक्रियेबाबत जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी घेण्यात आला आहे, असे मत व्यक्त केले. यासोबतच ३६ स्टॉलवर शासकीय विभागांनी माहिती दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून न्यायमूर्ती अनिल किलोर, तर मार्गदर्शक म्हणून न्यायमूर्ती प्रविण पाटील उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले, नगराध्यक्ष सुनील चौथमल, धारणी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रेमलाल कोगेकर, दत्तात्रय वमणे उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्री. किलोर यांनी शिबिराच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचलो आहेत. शिबिराचे हे ध्येय असून न्याय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या माध्यमातून मदत होणार आहे. संबंधिताला अधिकार आहेत, याची जाणीव करून देणे आणि त्याला माहिती देणे यासाठी शिबिर महत्वाचे ठरणार आहे. या परिसरात असलेल्या जमिनीचा प्रश्न, उच्च शिक्षणाची सोय, यासोबतच न्यायालयांसाठी जागा आदींबाबत सकारात्मक पावले उचलण्यात येतील. या भागात पॉस्कोच्या तक्रारी जादा असल्याने याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. त्यामुळे खटल्यांची संख्या कमी होऊन अन्याय दूर होण्यास मदत होईल, असे सांगितले.

न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत न्यायाचा संदेश पोहोचविण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याचे न्याय अधिकाराबाबत जनजागृती करणे हाच या शिबिरामागील उद्देश आहे. समाजामध्ये शोषणाविरुद्ध मौन बाळगल्यास असे करणाऱ्या व्यक्तीला बळ मिळत असल्याने या शिबिराच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. त्यासोबतच नागरिकांना आवश्यक असणाऱ्या योजनांची माहितीही देण्यात येत आहे. त्यामुळे नागरिक आणि न्यायव्यवस्था यांच्या सहकार्यातून मजबूत लोकतंत्र तयार होणार आहे. नागरिकांनी कोणताही संकोच न बाळगता न्याय मागण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी या शिबिरामुळे न्यायाची संकल्पना दुर्गम भागात पोहोचवली जाणार आहे. विधी सेवा हा सेतू म्हणून कार्य करीत असल्याने नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही. या माध्यमातून मदतीचे कर्तव्य बजाविल्या जाणार असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी धारणीमध्ये दुसऱ्यांदा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी अकराशे नागरिकांना वनपट्टे वाटप करण्यात आले आहे. वर्ग एक जमीन करण्याबाबत काही अडचणी येत असल्यास विशेष शिबिर घेऊन प्रश्न मार्गी काढण्यात येतील. न्यायालयासाठी धारणी उपविभागीय कार्यालयातील जागा

# नांदुरा लिनेस क्लबच्या अध्यक्षपदी शारदाताई कुटे यांची निवड

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**नांदुरा :** येथील लि. क्लबच्या अध्यक्षपदी शारदाताई कुटे यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. शारदाताई कुटे यांची निवड ही त्यांच्या नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा आणि समाजाबद्दल असलेल्या निष्ठेची पावती मानली जात आहे.

ही निवड प्रांताध्यक्ष कल्पनाताई देशमुख, प्रांत कोषाध्यक्ष लि. शीतलजी अग्रवाल, नांदुरा नगराध्यक्ष सौ. मंगलाताई मुरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात जाहीर करण्यात आली. यावेळी लि. रत्ना तांदळे यांची सेक्रेटरी, उज्वला बनसोड यांची कॅशियर, लि. कल्पना




तिवारी यांची उपाध्यक्ष, ली किरण बारालिया यांची उपाध्यक्ष लि. वनिता डोंगरे यांची जॉइंट सेक्रेटरी, लि. रेखा इंगळे 12tester लि. प्रियंका वराडे यांची टेमर, तर लि. रोशनी तांदळे यांची पीआरओ म्हणून निवड करण्यात आली.

# कांता नगरात गजानन महाराज प्रगट दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**अमरावती :** कांता नगर येथे स्थित श्री. गजानन महाराज मंदिरात गजानन महाराजांचा प्रगट दिन भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने मंदिरात सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महाराजांच्या मूर्तीचे पूजन, अभिषेक, आरती तसेच भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमादरम्यान श्रद्धाळूंनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले. मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. काही ठिकाणी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले, ज्याचा अनेक भक्तांनी लाभ घेतला.

शेगावचे संत श्री. गजानन महाराज हे महाराष्ट्रातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असून त्यांचा प्रगट दिन दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. या दिवशी भक्त सेवा, दानधर्म आणि सामूहिक धार्मिक उपक्रमांद्वारे श्रद्धा व्यक्त करतात. या उत्सवामुळे कांता नगर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनीही कार्यक्रमाचे स्वागत केले. जय गजाननच्या जयघोषात कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ७९ उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती कार्यालयाच्या आवारात 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास जिल्ह्यातील उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रोजगार मेळाव्यात एकूण १०० रिक्त पदांसाठी ऑनलाईन, ऑफलाईन २७४ उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी २४९ उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या व मुलाखती दिलेल्या उमेदवारापैकी ७९ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. या मेळाव्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, अभिषेक ठाकरे उपस्थित होते. या मेळाव्यात नामांकित खासगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यामध्ये जाधव गियर लि. चे विलास नाईक, प्लास्टी सर्ज प्रा. लि. चे संचालक श्री. डागा व श्रीमती पद्मिनी साहू, स्पंदन फायनान्सच्या केयुरी देशमुख, सनलाईट सोलरचे अक्षय वाळके, श्रीराम फायनान्सचे अजय बोंडे, विविक्सा प्रा. लि. चे उज्ज्वल बंग, रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉ. श्रीमती अग्रवाल आणि सहयोग मल्टी बँकचे श्री. गुप्ता या उद्योजकांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली. तसेच त्यांनी उपस्थित उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन विविध पदांवर प्राथामिक निवड केली. कार्यक्रमाचे संचालन आकाश येवले यांनी तर आभार कृपा अर्गुलेवर यांनी मानले.

# जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत तालुकास्तरावरील जनता दरबाराचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख हे जिल्ह्यातील विविध तालुक्यांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान नागरिकांची जमीन मोजणी, नगर भूमापन, एकत्रिकरण याबाबत समस्या सोडविणार आहेत. तसेच या कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबंधित दिवशी उपस्थित राहतील.

या जाहीर वेळापत्रकानुसार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते १:३० या वेळेत चांदुर रेल्वे आणि दुपारी ३ ते ६ या वेळेत तिवसा उपअधीक्षक कार्यालयात ते भेट देतील. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता नांदगांव खंडेश्वर आणि दुपारी ३ वाजता धामणगांव रेल्वे येथे दौरा नियोजित आहे. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते २ या वेळेत अमरावती मुख्यालय आणि दुपारी ३ ते ६ दरम्यान भातकुली उपअधीक्षक कार्यालयात आढावा घेतला जाईल. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, १२ फेब्रुवारी रोजी सकाळी मोर्शी आणि दुपारी वरूड येथे, तर १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता चांदुर बाजार आणि दुपारी ३ वाजता अचलपूर येथे जिल्हा अधीक्षक उपस्थित राहतील. १६ फेब्रुवारी रोजी दर्यापूर सकाळी १० वाजता आणि अंजनगांव येथे दुपारी ३ वाजता नागरिंच्या तक्रारींचे निवारण करण्यात येईल. दौऱ्याचा समारोप २० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत चिखलदरा आणि २३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत धारणी उपअधीक्षक कार्यालयातील भेटीने होईल. जनतेच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख महेंद्रकुमार शिंदे यांनी केले आहे.

# संत गजानन महाराजांनी दैवी शक्तीद्वारे अदभूत चमत्कार दाखविले - आमदार सुलभाताई खोडके

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**अमरावती:** संत गजानन महाराजांच्या जीवनातील विविध घटनातला अदभूतं रस, भाविकभक्तांच्या अंतःकरणात त्यांच्याविषयी भक्ती आणि श्रद्धा या उदात्त भावना उद्दीपित करण्यास कारणीभूत होतो. भक्ती आणि श्रद्धा हे दोन सात्विक भाव मनुष्याच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी नितान्त आवश्यक असतात. संत गजानन महाराजांनी आपल्या दैवी शक्तीचा प्रभाव वेळी अवेळी प्रकट करून अनेक अदभूत चमत्कार दाखविले. ते चमत्कार त्यांनी भक्तांजनांच्या अन्त: करणात भक्ती श्रद्धेचा दुर्वांकुर निर्माण करण्यासाठीच केले होते हे उघड आहे. सदगुणांचे माहेरघर म्हणजे संत होत! इच्छित वस्तू प्राप्त करून देणारी जशी कामधेनू, कल्पित वस्तू मिळवून देणारा ज्याप्रमाणे कल्पवृक्ष, लोहाचे सुवर्ण करून देणारा जसा परिस, चिंतीलेले देणारा जसा चिंतामणी तद्वतच जनतेचे सर्व इच्छित संत प्राप्त करून देतात, म्हणूनच आम्ही संतांना कामधेनूची, कल्पवृक्षाची, परिसाची व चिंतामणीची उपमा देतो! संतांच्या सतकृत्यांनी लोकांचे इच्छित मनोरथ पूर्ण होतात. कल्पित वस्तू त्यांना मिळतात. श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे. त्यामुळेच त्यांना ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. रविवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री संत गजानन महाराज प्रगट दिनोत्सव कार्यक्रमात त्या बोलत होत्या. दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दिनांक ८ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने श्री संत गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिवस साजरा करण्यात आला. याच शृंखलेत अमरावती येथे विविध धार्मिक - अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अशातच आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी राठी नगर - गाडगेनगर, स्वामी विवेकानंद कॉलनी, रहाटगाव, साईनगर, फ्रेंड्स कॉलनी, चक्रपाणी कॉलनी, अर्जुन नगर, श्रीहरी नगर, प्रिया टाउनशिप, न्यू आय. टी. आय. कॉलनी, कॅम्प, अमरावती या ठिकाणी जाऊन ब्रह्मांडनायक श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेत कृपाशीर्वाद घेतले. सर्वप्रथम शेगावनिवासी भक्तप्रतिपालक ' श्रींच्या ' प्रतिमेस नमन - वंदन - पूजन करून यावेळी आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी सर्व भाविकभक्तांचे मनोरथ पूर्ण होण्यासाठी ' श्रींच्या ' चरणी कामना केली. प्रगट दिनाच्या निमित्ताने अमरावती शहरात आयोजित ' श्री ' चा अभिषेक, हरिपाठ, आरती, गित गजानन, भजनसंध्या, किर्तन, महाप्रसाद, ह. भ. प. संतकवी श्रीदासगणू महाराज कृत श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सोहळा, पालखी सोहळा, श्रीमद भागवत ज्ञानयज्ञ सप्ताह आदी कार्यक्रमा स्थळी सुलभाताईंनी भेट देत सहभाग नोंदवला.

यानिमित्याने शहरात विविध ठिकाणी श्री गजानन माहात्म्य, // श्री गजानन महाराज भक्तविजय पारायण // तसेच ठ गण गण गणात बोते ठ या शब्दांचे उच्चारण अशा भक्तीभावपूर्ण वातावरणात संत गजानन महाराजांची महिमा संपूर्ण ब्रह्मांडात प्रचलित असल्याचे चित्र यावेळी दिसून आले. यावेळी आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते ' श्रींची ' आरती करण्यात आली. तदनंतर सर्व भावीकभक्तांच्या वतीने ठ श्री अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज परब्रम्हे भक्त प्रतिपालक शेगावनिवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय ठ असा सामूहिक जयघोष करण्यात आला.

# ९ फेब्रुवारीला दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

◆ आ. संजय खोडके यांनी दिली माहिती

**अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा दिवंगत उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्याला घेऊन येत्या सोमवार दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता, संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रमुख या श्रद्धांजली सभेला उपस्थित राहणार असल्याची माहिती आ.संजय खोडके यांनी दिली.

दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून तमाम चाहते व समर्थक शोकसागरात बुडाले आहे. दादांच्या पवित्र कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्यासाठी अमरावती येथे एक सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा व्हावी, अशी इच्छा आ.संजय खोडके व आ.. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे येत्या सोमवार दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता ,संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे अजितदादांच्या पवित्र कार्याचे स्मरण करून सामूहिक श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते, विविध समाज संघटना, मंडळे व संस्थाचे पदाधिकारी देखील उपस्थित राहतील, अशी माहिती आ.संजय खोडके यांनी दिली. तसेच सर्वांनी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील आ. संजय खोडके यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# खामगावच्या आठवडी बाजारातील अतिक्रमण हटविले

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

◆ पालिक प्रशासनाची कारवाई



**खामगाव :** येथील आठवडी बाजार परिसरात नगरपालिका अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या वतीने ८ फेब्रुवारी रोजी अतिक्रमण हटविण्यात आले. कोणतीही पूर्व सुचना न देता अचानक करण्यात आलेल्या या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली.

गेल्या काही दिवसांपासून शहरात अतिक्रमण हटविण्याची मोहीम थांबलेली होती; मात्र पुन्हा एकदा नगरपालिका प्रशासन सक्रिय होत आठवडी बाजार परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करीत परिसरातील चार दुकानांचे अतिक्रमण हटविले. या कारवाईदरम्यान जेसीबीच्या साहाय्याने एक टपरी हटविण्यात आली. त्यानंतर इतर अतिक्रमणकर्त्यांनी स्वतःहून आपली दुकाने हटविली. अतिक्रमण निर्मूलन विभागाने संबंधित संपूर्ण जागा मोकळी केली असून, यापुढेही अशी कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नगरपालिका विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आठवडी बाजारातील प्रस्तावित व्यापारी गाळ्यांच्या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. अतिक्रमण हटविण्यात आले असून, लवकरच या ठिकाणी व्यापारी गाळ्यांची उभारणी करण्यात येणार आहे.

# पुठ्ठा निर्मिती कारखान्याला आग, साहित्य खाक

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

◆ एमआयडीसीतील घटना : जीवितहानी नाही!

**खामगाव :** येथील एमआयडीसी परिसरातील एका पुठ्ठा निर्मिती कारखान्याला मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत मोठ्या प्रमाणावर कच्चा माल व साहित्य जळून खाक झाले.

एमआयडीसीतील संबंधित कंपनीत रात्री अचानक शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागल्याचे प्राथमिक कारण सांगण्यात येत आहे. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण कारखाना आपल्या भक्ष्यस्थानी घेतला.

आग लागल्याची माहिती मिळताच परिसरातील इतर कारखानदारांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, नगरपरिषदेच्या अग्निशमन दलास तत्काळ पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने चार ते पाच तास शर्थीचे प्रयत्न करून बंबांच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले; मात्र कारखान्यात साठवलेल्या पुठ्याच्या मालामुळे आगीने प्रचंड स्वरूप धारण केले होते.

या आगीत कारखान्यातील मोठ्या प्रमाणावरचा माल व इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे. एमआयडीसीतील भीषण आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला प्रयत्न करावे लागले. आगीचे स्वरूप गंभीर असल्याने खामगावसह बुलढाणा, मलकापूर, जळगाव जामोद आणि शेगाव येथील अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले. खामगाव नगरपालिकेच्या चार, तसेच इतर ठिकाणांहून प्रत्येकी एक अशा एकूण आठ अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग आटोक्यात आणण्यासाठी तब्बल ८० फेऱ्या माराव्या लागल्याची माहिती अग्निशमन विभागाने दिली.

**आकाश फुंडकर यांनी केली घटनास्थळाची पाहणी**

कारखान्याला आग लागल्याची माहिती मिळताच कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी रात्रीच एमआयडीसी परिसरातील घटनास्थळी भेट देत नुकसानाची पाहणी केली. संबंधित यंत्रणां शी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ज्ञानज्योती आधार व स्वयंम योजनेला मुदतवाढ

**अकोला:** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पं. दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजनांसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी दि. १५ फेब्रुवारीपूर्वी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालकांनी केले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या व बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना योजनेद्वारे भोजन भत्ता, निवास भत्ता, निर्वाह भत्ता यासाठी रक्कम थेट खात्यात जमा केली जाते.

अर्जदाराचे वय ३० हून कमी असावे. वार्षिक उत्पन्न २.५० लाख रू. च्या असावे. जात प्रमाणपत्र आवश्यक. कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतलेला नसावा. योजनेसाठी अर्ज hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन करावेत.

## शिवणी येथे श्री गजानन महाराजांचा प्रगटदिन उत्साहात साजरा



**अकोला :** समर्थ सदगुरु सेवा समीती शिवणी यांच्या वतीने संचालित श्री गजानन महाराज मंदिरात संत श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रगटदिन ५ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. टाळ मृदंगाच्या गजराने व श्री गजानन महाराजांच्या जयघोषाने शिवणी नगरी दुमदुमली होती.

या प्रगटदिन सोहळ्यानिमित्त सामुहिक पारायण, रुक्मिणी महिला भजन मंडळ मलकापूर तसेच बालाजी भजन मंडळ रुईखेड यांच्या बहारदार भक्तीगीतांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. यावेळी श्री दुर्गादेवी संस्थान, शिवर यांच्या वतीने काढण्यात आलेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखीचे भाविकांनी जल्लोषात स्वागत केले. कार्यक्रमांचा समारोप ह.भ.प. महादेव महाराज निमकंडे यांच्या काल्याच्या किर्तनाने झाला.

## पंचवीस वर्षांनंतर पुन्हा शाळेच्या अंगणात; जय बजरंग विद्यालयात भावनांचा महोत्सव

**अकोला :** स्थानिक जय बजरंग विद्यालय, कुंभारी येथे स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. तब्बल पंचवीस वर्षांनंतर विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी एकाच व्यासपीठावर एकवटताच शाळेचे अंगण आठवणी, हशा आणि ओलावलेल्या डोळ्यांनी भारावून गेले. बालपणाच्या आठवणींना उजाळा देणारा हा सोहळा परिसरात खमंग चर्चेचा विषय ठरला.

मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून विलास इंगळे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच स्व. तुकाराम भाऊ बिडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी शाळेच्या संस्कारांची परंपरा आणि मूल्यांची उजळणी झाली. कार्यक्रमात हनुमंत मराठी प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध व देखण्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## विद्यार्थ्यांत सभाधीटपणासाठी सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाचे – खा. अनुप धोत्रे

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** खेंडकर ज्ञान गंगेचे वार्षिक स्नेहसंमेलन प्रमिलाताई ओक सभागृहात पार पडले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांत सभाधीटपणासाठी येण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन खा. धोत्रे यांनी केले.




प्रमुख अतिथी उपमहापौर अमोल गोगे, राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनीष गावंडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर तर स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अलकेश खेंडकर, माजी अभियंता किशोर शिंदे, संस्थेच्या कोषाध्यक्ष मृणालिनी खेंडकर, उपाध्यक्ष अस्मिता खेंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी कोळीगीत, शेतकरी नृत्य, लावणी, राजस्थानी, दक्षिण भारतीय नृत्य केले. शाळेतील महिला पालकांसाठी विविध खेळ स्पर्धेमध्ये उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची व फॅन्सी ड्रेस स्पर्धा झाल्या. कार्यक्रमाचे संचालन उषा जगदाळे तर आभार प्रदर्शन आशा हिवरकर यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन नव्या मोहाडी, अनुष्का सोळंके, रिद्धी लामने, साक्षी बामनकर यांनी केले.

## ब्रम्ही येथे प्रगट दिनी गजानन महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील ब्रम्ही बाई येथे श्री गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त त्यांच्या विविध स्वरूपातील मूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या भक्तिभावात करण्यात आली. या निमित्ताने गावात तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

जयदेव पाथरे यांनी स्वतःची जागा दान करून स्वखर्चाने भव्य व दिव्य मंदिर उभारले असून, त्या मंदिरात श्री गजानन महाराजांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.



प्रगट दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये होम-हवन, कळस स्थापना, सकाळ व संध्याकाळ महिला व पुरुषांचे भजन आदी धार्मिक विधी पार पडले.

मूर्ती स्थापनेनंतर हभप मोहन महाराज यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री गजानन महाराजांच्या पालखीची गावातून भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.

या धार्मिक उपक्रमामुळे ब्रम्ही परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## मजिप्रा कार्यालय तोडफोड प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल दातकरसह ११ जण निर्दोष

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** दहिहांडा व परिसरात सतत पाणी टंचाई असल्याने १३/०१/२०१६ रोजी जिल्हा परिषद सदस्य तथा शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे यांचे सह अनेक कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण अकोला यांच्या कार्यालयात गेले होते. अधिकाऱ्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने व पाणी समस्येचे गांभीर्य नसल्याने आक्रमक होत आंदोलनकर्ते यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाची तोडफोड करून कार्यालयास कुलुप ठोकले. याप्रकरणी न्यायालयाने दातकर यांच्यासह ११ जणांची निर्दोष मुक्तता केली.

त्यावेळी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल करून जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हाप्रमुख गोपाल दातकर पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे सर्कलप्रमुख अविनाश राऊत अकोला तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक गजानन चराटे अनिल मोहरकार गोकुल कंडाळे सुधाकर शिरसाट निलेश डहाके गुलाबराव शिरसाट पांडुरंग पाटकर व सैयद शारीक यांना जिल्हा परिषद परिसरात अटक करण्यात आली होती. आंदोलकांना अटक झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी दहिहांडा परिसरातील हजारो ग्रामस्थ सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन ला पोहचले व त्यांनी आंदोलन केले आंदोलकांना न्यायालयात हजर करून न्यायालयाने जामीन वर मुक्त केले होते. जिल्हा व सत्र न्यायालय अकोला येथे सुनावणी दरम्यान सरकार पक्ष्याने एकुण ११ साक्षीदार तपासले व त्यांच्या उलट तपासणी दरम्यान आरोपीनीं तोडफोड शिवीगाळ व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे सिध्द न झाल्याने तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश ३ श्री तेजवंदरसिंग संधु यांनी सबळ पुराव्या अभावी सर्व आंदोलकांना निर्दोष मुक्त केले न्यायालयात आंदोलकांची बाजू ॲड. गणेश परियाल यांनी प्रभावीपणे बाजू मांडली

## वडाळी देशमुख येथे आनंद अनुभूती शिबिर

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोट:** वडाळी देशमुख येथे आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती शिबीर आयोजित करण्यात आले आहे.



शुद्धीकरणाची सुदर्शन क्रिया सोबतच विविध प्रक्रियांचे माध्यमातून हसत खेळत सुंदर ज्ञान याचा संगम आहे. योग, प्राणायाम, ध्यान व अमृत ज्ञान प्राप्त होईल. १८ वर्षावरील सहभागी होऊ शकतात. ९ ते १४ सायंकाळी ५ ते ८ दरम्यान शिबिराचा लाभ घ्यावा. चतुर्भुज महाराज समाधी मंदिरात शिबीर होईल. साहेबराव बोडखे, ममताताई मुंहेकार, उषाताई खलोकार यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## पिकविमा प्रश्नांवर अमरावतीत महत्त्वाची बैठक




प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**मूर्तिजापुर :** भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे सदस्य राहुल राठी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकविमा प्रश्नांबाबत अत्यंत महत्त्वाची बैठक निश्चित करण्यात आली असून, त्यासंदर्भातील अधिकृत पत्रे प्राप्त झाली आहेत. यानुसार मंगळवार १० फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता विभागीय कृषी संचालक यांच्या दालनात ही बैठक होणार आहे. या बैठकीत सन २०२३ खरीप व रब्बी हंगाम, तसेच सन २०२४ खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकविम्याच्या वैयक्तिक तक्रारींवर चर्चा केली जाणार आहे. त्यामुळे संबंधित तक्रारदार शेतकऱ्यांनी विमा पावती, तक्रार पावती व आवश्यक इतर कागदपत्रे सोबत घेऊन बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ही बैठक मुर्तीजापुर तालुका तसेच कुरूम मंडळातील सर्व शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, बैठकीचे स्थळ विभागीय कृषी संचालक कार्यालय, अमरावती आहे.

## आकोली जहागीर येथे श्रींचा १४८ वा प्रकट दिन महोत्सव भक्तिभावात साजरा

वि. प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोट :** अकोट तालुक्यातील आकोली जहागीर येथे श्री गजानन महाराजांनी सजल केलेल्या विहिरीवर श्रींचा १४८ वा प्रकट दिन महोत्सव रविवार, ८ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गेल्या सात दिवसांपासून भाविकांनी योगेश महाराज हिवाळे यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा श्रवणाचा लाभ घेतला. तसेच सप्ताहात नामवंत कीर्तनकारांची कीर्तनेही संपन्न झाली.

प्रकट दिनाच्या पूर्वसंध्येला श्री तीर्थ पुष्करणीपासून आकोली जहागीर गावातून श्रींच्या पालखीची



भव्य परिक्रमा काढण्यात आली. या परिक्रमेत श्री संस्थेच्या दिंडीसह अकोट, वडगाव मेंढे, पुंडा, दिवठाणा आदी गावांतील दिंड्या व हजारो गजानन भक्त सहभागी झाले होते. गावात ठिकठिकाणी रांगोळ्या काढून घरोघरी पालखीचे पूजन करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजराने संपूर्ण नगरी दुमदुमून गेली होती.

गावातील प्रमुख मार्गांवरून, श्री गजानन महाराज व भास्कर महाराज या गुरू-शिष्यांच्या मंदिराजवळून पालखी मार्गस्थ झाली. मार्गात भाविकांनी पालखीचे पूजन, स्वागत व शीतपेयाची व्यवस्था केली होती. श्रींच्या विहिरीवर मिरवणुकीचा समारोप आरतीने झाला. प्रकट दिनानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत श्रीधर बुवा अवारे यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले. दुपारी १२ वाजता फुलांची उधळण व श्रींच्या नावाचा जयजयकार करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ उपस्थित भाविकांनी शिस्तबद्ध रीतीने घेतला. श्री संस्थेच्या सेवाधारी मंडळींनी दर्शन व महाप्रसादाची व्यवस्था उत्तम होती.

## संत गजानन महाराजांची पालखी शोभायात्रा

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**कुटासा :** येथे संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त भाविकांच्या वतीने भव्य पालखी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. जय गजानन, श्री गजानन आणि गण गण गणात बोतेच्या जयघोषाने संपूर्ण कुटासा नगरी दुमदुमून गेली होती. महोत्सवाचे मुख्य आकर्षण श्रीच्या पालखीचे फुलांनी सजवलेल्या आकर्षक घडवण्यात आले.पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही शोभायात्रा गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी आणि सुवासिनींनी पालखीचे पूजन करून फुलांची उधळण केली.या



सोहळ्यात ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि बाल गोपाळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात भगव्या पताका घेऊन आणि टाळ-मृदंगाच्या तालावर भजने गात भक्तांनी भक्तीचा आनंद लुटला. या सोहळ्यामुळे गावात सर्वत्र चैतन्य आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी स्थानिक गजानन भक्त मंडळ आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शिस्तबद्ध नियोजन आणि भक्तीमय वातावरणामुळे हा प्रकट दिन सोहळा भाविकांसाठी संस्मरणीय ठरला.

## पिलकवाडी येथे टाळ मृदुंगाच्या गजरात ब्रह्मचारी महाराजांची पालखी





प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोट:** तालुक्यातील पूर्णा नदीच्या तीरावर वसलेले पीलकवाडी नखेगाव हे गाव संतांची नगरी ओळखली जाते. गावाचे आराध्य दैवत ब्रह्मचारी महाराज येथील गावकरी बांधव गेल्या तीन पिढ्यांपासून १३७ वर्षाची परंपरेनुसार दरवर्षी मोठ्या भावा भक्तीमध्ये श्री ब्रह्मचारी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा सुरुवात संपूर्ण गावातील मुख्य रोड स्वच्छ गाव सुंदर गाव या जागी झाडे लावा झाडे जगवा या प्रेरणादायी संदेशातून व साफसफाई रांगोळ्या फुलांची सजावट करून गावांमधून प्रदक्षिणा घेऊन अखंड हरिनाम सप्ताह व यात्रा महोत्सवाला श्री संत ब्रह्मचारी महाराज पुण्यतिथी सोहळा व महाशिवरात्री यात्रा उत्सवाची सुरुवात येथून होते गावातील मोडक परिवारा तून महाराजांच्या फोटो प्रतिमा व सजवलेल्या पालखीला घरून मिरवणूक काढत गावातील महिला पुरुष भाविक मंडळी विठोबा रुक्माई च्या मंदिरात येऊन पूजा आरच्या व त्या ठिकाणी दर्शन घेऊन सर्व भाविकांना वसंतराव गंगाराम मोडक पुजारी यांच्याकडून चहा पाणी फळ फराळाचे वाटप केल्या जाते व त्यानंतर जि. प. प्राथमिक शाळेत सर्व शिक्षक यांच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याचे स्वागत व सर्वांचे कुमकुम तिलक करत पूजन प्रसाद चहा पाण्याचे आयोजन केले गावातून टाळ मृदुंगाच्या गजरात सर्व गावातील सर्व धर्म समभावाच्या एकतेचे प्रतीक सर्व समाज बांधव उपस्थिती लावून मिरवणूक मारुती महाराज संस्थान प्रदक्षिणात घेत पूर्णा नदीच्या तीरावरील पुरातन वसलेले रामपुरी महाराज संस्थान परिसरात पालखी पूजन व मंदिरातील पूजन आटपून गाव प्रदक्षिणा घेत पानेट येथील श्री मारुती व ब्रह्मचारी महाराज यांच्या पानेट दिंडी पालखी महाप्रसादासाठी प्रस्थान झाली. यावेळी ब्रह्मचारी महाराज संजीवनी पादुका मंदिरात पानेट संस्था विधीनुसार काकडा कीर्तन व तीर्थ घटकस्थापना होते पालखी सोहळ्यामध्ये उत्तमराव मोरोदे, भीमराव तायडे, श्रावण पाखरे, पुरुषोत्तम मोडक, प्रकाश कुकडे, विलास मोडक, दत्तात्रय गावंडे, दिनेश मोडक, निखिल गावंडे, हर्षल ठाकरे, भूषण मोडक, राजेंद्र मोडक, अमर मोरोदे, अरुण मोडक, हर्षल ठाकरे, मनीष मोडक ,पो.पा.दीपक वाघमारे, ग्रा.सदस्य मनोज वाघमारे, उपसरपंच अर्चनाताई प्र. बघे, माजी उपसरपंच राजेंद्र मोडक, सरपंच दिनेश वाघमारे सह शनिवार ६ पासून ते सांगता सोमवार १६ पर्यंतच्या अखंड हरिनाम सप्ताह व यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे पंचक्रोशीतील भाविकांना आयोजक मारुती व ब्रह्मचारी महाराज पानेट संस्थान यांनी आवाहन केले आहे.

## शशिकला राऊत इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोट:** तात्यासाहेब राऊत बहुउद्देशीय विकास संस्था सावरा संचालित शशिकला राऊत इंग्लिश स्कूल नंदीपेठ येथे वार्षिकने संमेलन नुकतेच झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विजय ढेपे तर प्रमुख अतिथी प्रथमेश बोरोडे उपनगराध्यक्ष नगर पालीका अकोट तसेच किसन लोखंडे , गजानन राऊत , स्वातीताई राऊत आदीची उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सावित्रीबाई



फुले आदि थोर महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पन मान्यवरांनी केले. या प्रसंगी संस्थेच्या वतीने गजानन राऊत व स्वाती राऊत यांनी विजयभाऊ ढेपे प्रथमेश बोरोडे किसन लोखंडे यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव केला. याप्रसंगी मान्यवरांनी विविध स्पर्धेत प्राविण्य प्राप्त प्रथम द्वितीय तृतीय स्पर्धकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांनी गौरव केला. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महा आरतीने कार्यक्रमाची सुरूवात झाली.यानंतर शाळेतील चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मनी जिंकली.याप्रसंगी शाळेच्या प्रा. प्रियंकाताई पांडे यांचा शाल व श्रीफळ देऊन संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला तसेच शिक्षक वृंद यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे संचालन कु नेहा राजवैद्य तर प्रास्ताविक राऊत सर यांनी तर आभार प्रियंकाताई पांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करता मीनलताई सावरकर, कु नेहा राजवैद्य, सौ ठाकरे मॅडम आदींनी परिश्रम घेतले.

## सहकार नगरात श्रींच्या प्रगटदिन निमित्त भक्ती गीते व अभंग गायन

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** सहकार नगर पंजाबराव देशमुख नगर, हरिष कॉलनी येथे संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त प्रसिद्ध गायक प्रा.डॉ.नीरज लांडे यांनी भक्ती गीते, अभंग गायनाचा कार्यक्रम आयोजित




करण्यात आला होता.

मनीष हुडेकर, निनाद चतारे यांनी तबल्याची साथ केली. ८ फेब्रुवारीला रात्री ८:०० ते १०:०० वाजेपर्यंत झालेल्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्ट व समितीने आयोजन केले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# विद्यार्थिनीवर अत्याचार; मुख्याध्यापकाला ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**यवतमाळ :** जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेतील मुख्याध्यापकावर एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या घटनेने खळबळ उडाली असून, संताप व्यक्त होत असून, या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्याध्यापक किशोर मालविल (वय ५०, रा. यवतमाळ) याला अटक केली.


मुख्याध्यापकाने ५ फेब्रुवारी रोजी विद्यार्थिनीला बोलावून कारमध्ये जबरदस्तीने अत्याचार केला. पीडितेने हा प्रकार कुटुंबियांना सांगितल्यावर पालकांनी तातडीने पोलिसांत तक्रार नोंदवली. या घटनेने घाटंजी तालुक्यातील शैक्षणिक वातावरणात मोठी खळबळ उडाली आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारली असताना, पदावर असलेल्या मुख्याध्यापकाकडूनच हा प्रकार घडल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पालकांनी मुलींना शाळेत पाठवण्याबाबत चिंता व्यक्त केली असून, शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शिक्षण क्षेत्रात अशा घटना वारंवार घडत असल्याने समाजात गंभीर चिंतेचे वातावरण आहे.

या घटनेमुळे शिक्षक समाजातील विश्वासार्हता धोक्यात आली असून पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक सजग राहणे गरजेचे ठरले आहे. स्थानिक नागरिक आणि समाजसेवकांनी शाळांमध्ये विद्यार्थिनींची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी शाळा प्रशासनाकडे आणि पोलीस यंत्रणेकडे त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

घाटंजी तालुक्यातील या घटनेने शिक्षण क्षेत्रातील सुरक्षितता, शिक्षकांची जबाबदारी आणि पालकांची काळजी यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहे. घाटंजी पोलीस ठाण्यात पीडितेच्या तक्रारीनुसार बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा (POCSO) कलम ४ व ६ तसेच भारतीय दंड संहिता कलम ६४ (२) (m)(f), ६५ (१) आणि ३५१ (३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घाटंजी पोलीस ठाण्याचे ठाणेदार केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड पुढील तपास करत आहेत.

# दुचाकीची बॅरिकेटला धडक; एक ठार, एक जखमी

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**यवतमाळ :** यवतमाळ-नागपूर तुळजापुर रोडवरील हॉटेल अनमोल समोर काल रात्री ९ वाजता दुचाकी अपघातात एक जण ठार तर एक गंभीररित्या जखमी झाला. ही घटना यवतमाळ-नागपूर तुळजापुर रोडवरील हॉटेल अनमोल समोर काल रविवारी रात्री 09:00 वाजता घडली.

चंदन दिलीप शेंद्रे (वय 40, कीनगाव, हिंगणघाट) असे मृतकाचे नाव आहे. तर ज्योतीश बाँदाळे (वय 45) असे जखमीचे नाव आहे. रेल्वे कॉर्टरच्या नळ फिटींगचे काम पूर्ण करून MH 40, Z-1969 दुचाकीवर जात असताना सिमेंटच्या बॅरिकेटला धडकून अपघात झाला. या अपघातात चंदन शेंद्रे जागीच ठार झाला तर ज्योतीश बोदाडे गंभीर जखमी झाला असून त्याला यवतमाळ सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोलिसांनी तातडीने भेट देऊन तपास सुरू केला आहे. फिर्यादी सुरज दिलीप शेंद्रे यांच्या तक्रारीनुसार, अपघात हा दुचाकीवरील नियंत्रण चुकल्यामुळे झाला आहे. पोलीस ठाण्यात कलम 106(1), 125(A), 281 BNS अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, तपास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांना अपघातस्थळी दक्ष राहण्याचे आवाहन केले.

## सोन्याची पोत लंपास

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**यवतमाळ :** गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त गणेश नगरातील गणेश मंदिरात आयोजित महाप्रसाद कार्यक्रमादरम्यान चोरीची घटना घडली. सौ. सुरेखा सूर्यकांत दूद्दलवार यांच्या गळ्यातील सुमारे २० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेऊन लांबवली. वडगाव परिसरातील डॉ. विनोद दूद्दलवार कुटुंबासह दर्शन व महाप्रसादासाठी मंदिरात आले होते. सकाळी साडेअकराच्या सुमारास कार्यक्रम आटोपून घरी निघताना पोत नसल्याचे लक्षात आले. सर्वत्र शोध व लाऊडस्पीकरवरून घोषणा करूनही पोत मिळाली नाही. अखेर अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केला.

# पुसद येथे ट्रॅव्हल्सला भीषण आग

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**पुसद :** पुसद शहरातील इटावा वार्ड परिसरात मध्यरात्री थरारक घटना घडली. पुसद–पुणे मार्गावर धावणारी अंजली ट्रॅव्हल्स अचानक भीषण आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री साडे १२ वाजताच्या सुमारास, पुसद येथील इटावा ट्रॅव्हल्स पॉईंटजवळ उभी असलेल्या ट्रॅव्हल्सला अचानक आग लागली आणि काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले.

या आगीत ट्रॅव्हल्सचा संपूर्ण आतील भाग जळून खाक झाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित ट्रॅव्हल्समध्ये त्या वेळी प्रवासी नसल्याने मोठा अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच पुसद नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत ट्रॅव्हल्सचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

सदर ट्रॅव्हल्स वाहन क्रमांक MH 04 FK 05 बावन्न असून ती जावेद शेख निसार शेख (रा. छत्रपती संभाजीनगर) यांची असल्याची माहिती आहे.

दरम्यान, ही आग अपघाती नसून जाणूनबुजून लावण्यात आल्याचा संशय इतर ट्रॅव्हल्स चालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## मोबाईल टॉवरवर चोरट्यांचा डल्ला; साहित्य लंपास

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**घाटंजी :** टिटवी शिवारात असलेल्या एका मोबाईल टॉवरवर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारून सुमारे १२ हजार रुपये किमतीचे महत्त्वाचे तांत्रिक साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अमोल देवीदास गुजर (रा. यवतमाळ) यांनी पारवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टिटवी शिवारातील निर्जन भागात असलेल्या मोबाईल टॉवरची सुरक्षा व्यवस्था अपुरी असल्याचा फायदा घेऊन चोरट्यांनी ही चोरी केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये टॉवरच्या कार्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या उपकरणांचा समावेश असून, त्यामुळे परिसरातील मोबाईल नेटवर्क सेवेत अडथळा निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पारवा पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेऊन पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून, संशयित हालचालींच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. ग्रामीण भागातील मोबाईल टॉवरवर सातत्याने होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, टॉवर कंपन्यांनी सुरक्षा उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी होत आहे.

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप, कामे ठप्प; मुंबईत आंदोलन

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी




**बाभुळगाव :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संपाची घोषणा केली आहे. या आंदोलनामुळे जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत होणारी सर्व विकास कामे ठप्प झाली आहेत.

संपाच्या मागण्या: मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सेवेत सामावून घ्यावे. कंत्राटी पद्धतीने होणारी भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी. सर्व कर्मचाऱ्यांना समान काम, समान वेतन धोरण लागू करावे. मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार करावी.

या मागण्यांसाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील कंत्राटी कर्मचारी, राज्य समन्वयक, तांत्रिक सहाय्यक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, क्लार्क, डाटा ऑपरेटर आणि शिपाई यासह विविध कर्मचारी एकत्रित झाले असून, १ फेब्रुवारीपासून मुंबईतील आझाद मैदानात साखळी उपोषण, अन्नत्याग आंदोलन करत आहेत. सहा दिवसांपासून या आंदोलनामुळे कामकाज ठप्प झाले आहे, ज्याचा ग्रामिण भागातील रोजगार प्रक्रिया आणि व्यवस्थापनावर मोठा परिणाम झाला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील जवळपास 70,156 कामे मागील १५ दिवसांपासून रखडली आहेत. सिंचन विहिरी, गोठे, पांधन रस्ते, घरकुल, वृक्ष लागवड यांसारखी महत्त्वाची योजना पूर्णपणे कोलमडली आहे. यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांची आश्वासनं ऐकली आणि त्यांच्या मागण्याबाबत अधिवेशनात लक्ष वेधून घेण्याचे आश्वासन दिले.

या आंदोलनामुळे ग्रामिण भागातील लोकांचे विकास कार्य सध्या ठप्प झाले आहे, आणि आंदोलनकर्ते मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन कायम ठेवण्याची तयारी दर्शवत आहेत.

# पंतप्रधान आवास योजनेतून जाणीवपूर्वक नाव गहाळ

**धनज ग्रामपंचायतीतील प्रकार, लाभार्थ्यांची गटविकास अधिकाऱ्याकडे तक्रार**

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**उमरखेड :** तालुक्यातील ग्रामपंचायत धनज येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्याचे नाव जाणीवपूर्वक वगळून त्यास घरकुलाच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मौजे धनज येथील लाभार्थी मारोती खंडू मोडक यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे शंभर रुपयांच्या बॉण्डवर लेखी तक्रार दाखल केली आहे.

मारोती मोडक यांचे नाव पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थी यादीतील क्रमांक ६-डी मध्ये समाविष्ट होते. त्यानुसार त्यांनी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता ग्रामपंचायतीकडे केली होती. मात्र, घरकुलाबाबत ग्रामपंचायत सचिव, सरपंच, सदस्य व संबंधित पदाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. पात्र असतानाही जाणून-बुजून आपले नाव योजनेतून वगळण्यात आल्याचा आरोप मोडक यांनी केला आहे. तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, पंतप्रधान आवास योजनेत घरकुल बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर जिओ-टॅगिंग आवश्यक असताना, संबंधित अभियंता अविनाश आडे यांनी काही लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण झालेले नसतानाही आर्थिक देवाणघेवाणीच्या माध्यमातून घरकुलाची संपूर्ण रक्कम त्यांच्या खात्यात जमा केल्याचा संशय आहे. याप्रकरणी प्रत्यक्ष बांधकाम न करता लाभ घेतलेल्या तसेच अन्य पात्र लाभार्थ्यांना डावलण्यात आलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची मागणी मारोती मोडक यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या तक्रारीमुळे धनज ग्रामपंचायतीतील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून प्रशासनाकडून चौकशी होणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# तलवार घेवून फिरणाऱ्या आरोपीला अटक

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील चांदणी चौक परिसरात एका धक्कादायक घटनाची उघडकी झाली. डॉक्टर दाड़ी यांच्या दवाखान्याकडे जाणाऱ्या डांबरी रोड परिसरात दोन संशयित व्यक्ती तलवार बाळगून फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना मिळाली. ही माहिती मिळताच तातडीने कार्यवाही करत पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ठाणेदार साहेब यांच्या देखरेखीखाली डी.व्ही. पथक घटनास्थळी पोहोचले.

घटनास्थळी पांढऱ्या रंगाची स्वीफ्ट कार जप्त केली असून, शुभम संजय मानेकर (वय २५, शिवाजी नगर) आणि सुनील उत्तम रूढे (वय ३२, दिग्रस) अशी आरोपींची नावे आहे. जप्त केलेल्या तलवारासह अन्य उपकरणांची किंमत अंदाजे ५०,०००/- आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा १९५९ तसेच भारतीय दंड संहिता कलम ३(५), ४, २५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधिक्षक कुमार चिंता आणि अप्पर पोलीस अधिक्षक अशोक चीयत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. आनंदराव बाहोरे, पो.उप. नि. सपकाळ, पो.हवा.२०१२ रावसाहेब शेंडे, पो.हवा.२२२५ सुरेश राठोड, पो.हवा.२२२९ किरण पन, पो.को.२४० प्रतिक नेवरे, पो.को.४०० मयुर वेल्लेवार यांनी केली.

# भोपाळमधील विचारमंथन परिषदेत अंबोडा ग्रामपंचायतीचे प्रेझेंटेशन

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी




**आर्णी :** आर्णी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत अंबोडाने राबविलेल्या ॲनिमिया मुक्त अभियानमध्ये सक्रिय सहभाग दाखवत, उल्लेखनीय कार्य केले आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे अंबोडा गावातील महिलांमध्ये, किशोरवयीन मुलींमध्ये आणि बालकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, रक्तक्षय (ॲनिमिया) प्रतिबंधासाठी सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

या यशस्वी उपक्रमाची दखल घेऊन सहाय्यक ट्रस्ट, मुंबई यांच्या माध्यमातून भोपाळ (मध्यप्रदेश) येथे आयोजित राज्यस्तरीय मंथन कार्यशाळामध्ये अंबोडा गावाचे प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. कार्यशाळेत अंबोडा गावाने केलेल्या जनजागृती मोहिमांची आणि आरोग्य सुधारण्यासाठी राबविलेल्या योजनांची सविस्तर माहिती मांडली. या कार्यक्रमात अस्मिता संस्थेचे अध्यक्ष संगीता गायकवाड व समन्वयक वैभव गायकी यांनी सन्मान स्वीकारला.

> ■ ॲनिमिया मुक्त अभियान एक महत्त्वपूर्ण आणि व्यापक उपक्रम आहे, जो निरोगी समाज निर्मितीसाठी अत्यावश्यक आहे. लोहयुक्त गोळ्यांचे सेवन, नियमित आरोग्य तपासणी आणि जनजागृती यामुळे रक्तक्षयावर नियंत्रण मिळवता येते. अंबोडा गावाने यामध्ये दाखवलेल्या आदर्शाने इतर गावांसाठी प्रेरणा दिली असून, ॲनिमिया मुक्त भारत संकल्पना यशस्वी होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.
> - विजयकुमार एस. ठेंगेकर, ग्रामपंचायत अधिकारी, अंबोडा

कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, मध्यप्रदेश येथील विविध संस्था तसेच मध्यप्रदेश विद्यापीठातील कुलगुरू व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी सेंद्रिय पोषण परसबाग आणि ॲनिमिया मुक्त गाव अभियान यावर चर्चा झाली, तसेच विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी आपले कार्य प्रदर्शित करणाऱ्या प्रदर्शनीचे आयोजनही केले.

# गणगणात बोतेच्या जयघोषाने पोफाळी नगरी दुमदुमली; भक्तांचा जनसागर उसळला

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**उमरखेड :** तालुक्यातील पोफाळी येथे संत गजानन महाराज संस्थानच्या वार्षिक प्रगट दिनचा सोहळा दि. ८ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. १ फेब्रुवारीपासून सुरू झालेला सात दिवसांचा कार्यक्रम ८ फेब्रुवारी रोजी महाप्रसाद वितरण व पालखी सोहळ्याद्वारे संपन्न झाला.

सात दिवसांच्या सोहळ्यात श्री मद भागवत कथा पारायण, प्रवजन, हरिपाठ, किर्तन आणि अन्नदान या कार्यक्रमांचा समावेश होता. ८ फेब्रुवारीला गावभरातून येणाऱ्या भाविकांच्या घरोघरी पालखीचे पूजन करण्यात आले. दुपारी काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पंचकोषीतील गावे जसे की पोफाळी, जनुना, गंगण, माळ, अंबाळी, कळमुला, तरोडा, पळशी, दिवट, पिंपरी, कुपटी, मुळावा, तिवरंग, झाडगाव, नागापूर, मरसुळ, उमरखेड यातील भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.


मंदीराच्या सभागृहात हजारो महिला, पुरुष आणि बालकांनी महाप्रसाद घेतला. पोफाळी नगरीत गणगणात बोते नामाच्या गजराने दुमदुमली, आणि एक प्रकारे शेगावचा गजानन प्रगटला असे चित्र दिसून आले. हजारो भाविकांचा जनसागर उसळल्याने वातावरण भक्तिभावाने भरले होते.

संस्थानाचे अध्यक्ष संतोष ठाकरे, गणेशराव शिलार, विनायक मुळावकर, राजेंद्र क्षिरसागर, अरुण ठाकरे यासह इतर पदाधिकारी व स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या यशासाठी अथक परिश्रम घेतले. गावातील असंख्य भक्त आणि स्थानिक नागरिकांनी उत्साहपूर्वक उपस्थित राहून सोहळ्याला गौरव दिला.

या धार्मिक कार्यक्रमातून गावातील भक्तीभाव अधिक प्रगल्भ झाला असून, संत गजानन महाराज संस्थानने पोफाळी नगरीत भक्तांच्या एकात्मतेचा अनोखा अनुभव उभा केला, असे स्थानिकांनी सांगितले.

# व-हाड मंचाने फुलविले वृध्दअनाथांचे चेहऱ्यावर हास्य

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी




**नेर :** सध्या ठिकठिकाणी संतश्रेष्ठ गजानन महाराज यांचा १४८ वा प्रगटदिन साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून व-हाड साहित्य मंच मित्र परीवाराने, मंचाचे मार्गदर्शक गजानन नागपूरे यांच्या प्रेरणेत, नेर येथील नवजीवन वृध्दाश्रम येथे वृध्द अनाथांच्या चेह-यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न केला.

व-हाड मंचाचे राज्य सचिव लेखक प्रफुल आकोलकर यांच्या वतीने अनाथ आश्रमातील तब्बल ५० जणांना भाकर-बेसन-भरीत-ठेचा-चंपाकली यांचा भोजनदान करण्यात आला. यावेळी नवजीवन आश्रमाच्या संचालिका प्रिया भोयर यांनी सांगितले की, केवळ दोन वर्षांत त्यांनी तब्बल ७० जणांचे पुनर्वसन केले आहे. येथे पुणे, वृंदावन, श्रीगोंदा आणि औरंगाबाद जिल्ह्यांतील वृध्दांचा प्रवेश आहे. आश्रमाचे कार्य संचालक प्रविण उके व त्यांच्या टीमद्वारे चालविले जाते. सदर कार्यक्रमात व-हाड मंचाचे सदस्य विपूल खिवसरा यांनी आश्रमाला दोन बेड दान केले. प्रास्ताविकात सांगण्यात आले की, व-हाड मंचाचे कार्य गाडगेबाबा व संत तुकडोजींच्या विचारांवर आधारित आहे. तसेच, अन्नदान हे कीशोर वंजारी यांच्या वडिलांनं, जेष्ठ पत्रकार स्व. नारायण वंजारी यांना भावनिक श्रध्दांजली म्हणून समर्पित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश डुंबरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पियुष भोयर यांनी मानले.

यशस्वीतेसाठी संतोष ढेंगे, मयुर काळे, संदेश बांबोर्डे, प्रीती आकोलकर, शिल्पा आकोलकर आदींनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com




# प्रशासनाचा नाही काबू, भ्रष्टाचार झाला बेकाबू !

## जे नसे ललाटी ते लिखे तलाठी, भ्रष्टाचारातून हडपले अनेक कोटी *वाशिम जिल्ह्यातही ' महाघोटाळा ' उघड होण्याची शक्यता ?

● वसंत खडसे @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या व येत असलेल्या विविध शासकीय योजनांमध्ये सरकारी अधिकारी आणि कर्मचारी लोकांकडून होणारे गैरव्यवहार ही आता नित्याचीच बोंब होऊन बसली आहे. असाच एक धक्कादायक ' महाघोटाळा ' नुकताच जालना जिल्ह्यात उघडकीस आला आहे. सदर घोटाळ्यात अतिवृष्टी अनुदान योजनेतून तब्बल २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक बाब समोर आली असून या प्रकरणात मोठी साखळी कार्यरत असल्याची माहिती समोर येत आहे. यात २२ तलाठ्यांसह, विविध विभागातील एकूण ३२ आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. परिणामी संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली असून वाशिम जिल्ह्यात सुद्धा २०२३-२४ ची अतिवृष्टी २०२४-२५ चा दुष्काळ निधी आणि पीकविमा वाटपात मोठा घोटाळा झाला असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या बाबत अनेक पुरावे आता पुढे येत आहेत. केवळ बँक खात्याला संलग्नित असलेल्या अनेकांच्या बँक खात्यात दुष्काळ निधी, अतिवृष्टीचा निधी आणि पीकविमा निधी जमा करण्यात आला असल्याचे बोलले जात आहे. यातील बरेच पुरावे समोर येत असून पोकरा योजनेतील गैरप्रकरण चौकशीत असतांनाच पुन्हा एक 'महाघोटाळा' उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





जालना जिल्ह्यातील घनसावंगी तहसील कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असलेला आशिष प्रमोदकुमार पैठणकर हा या घोटाळ्यातील 'महाबैल' ठरला असला तरी यामध्ये खुप मोठी साखळी कार्यरत होती हे सिद्ध झाले आहे. त्या अनुषंगाने जालना आर्थिक क्राईम ब्रँचने तब्बल ३२ जणांवर अटकेची कारवाई केली आहे. तर यातील ३ आरोपी अद्यापही फरार आहेत. या महाघोटाळ्यात महसूल, कृषी, पंचायत आणि आपत्ती व्यवस्थापन विभागातील अधिकारी व कर्मचारी गुंतल्यामुळे शासकीय प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. सदर भ्रष्टाचाराची वार्ता राज्यभर पसरली असल्याने आता वाशिम जिल्ह्यातही असाच एक महाघोटाळा उघड होणार असल्याचे बोलले जात आहे. पोकरा योजनेतील गैरप्रकरणाने रिसोड तालुका राज्यभर गाजला आहे. परिणामी आता त्यातूनच अतिवृष्टी, दुष्काळ निधी आणि पीकविमा वाटपातील भ्रष्टाचाराला तोंड फुटणार आहे. यातील काही सबळ पुरावे हाती आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

राज्यात सन २०२३ पासून ते २०२४-२५ पर्यंत सातत्याने राज्यातील विविध जिल्ह्यात अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस आणि महापुरामुळे शेतीपिकांच मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळलं आहे. अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेकडो कोटी रुपयांचे अनुदान पॅकेज जाहीर करून दिले होते. त्यासाठी नुकसानग्रस्त एकूण ३४ जिल्ह्यातील ३ लाख ९८ हजार ६०३ बाधित शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले आहे. यात अमरावती विभागातील अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यांचा समावेश होता. मात्र वाशिम जिल्ह्यातील पोकरा गैरप्रकाराला वाचा फुटल्यानंतर खऱ्या अर्थाने वाशिम जिल्हा भ्रष्टाचाराच्या रडारवर आला आहे. जालना जिल्ह्यातील घोटाळ्याने झोपलेली भूते जागी झाली असून, केवळ बँक खात्याला संलग्नित असलेल्या अनेकांच्या आधार आयडीवरून कुठलेही निकष न लावता अनुदान वितरित केले असल्याची माहिती समोर येत आहे. यात सुद्धा एकाच कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या आधार आयडीवरून प्रत्येकी ४० हजारांच्या पुढे अनुदान सोडण्यात आले आहे. या गंभीर प्रकाराची चाचपणी करून काही सबळ पुरावे उपलब्ध झाले आहेत. सदर पुराव्याच्या आधारावर लवकरच वरिष्ठ स्तरांवर तक्रार दाखल करण्यात येणार असून रिसोड तालुक्यातील काही ठराविक गावातील बँक खाते तपासण्यात यावे अशी मागणी करण्यात येणार आहे. यात शेकडो बोगस शेतकरी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर प्रशासनातील बडे मासे गळाला लागणार आहेत.


### ...अखेर चौकशीतूनच महाघोटाळ्याचे बिंग फुटले...

कर्तव्यदक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेतली तर, वरिष्ठ स्तरांवर तक्रार करण्याची गरजच भासत नाही, हे जालन्याच्या चौकशीतून सिद्ध झाले आहे. या गैरव्यवहाराबाबत जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त होताच, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी तीन सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालात तब्बल २५ कोटींच्या अफरातफरीवर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. त्यानंतर तातडीने अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगात फिरू लागली. परिणामी या प्रकरणातील मुख्य आरोपी अखेर पोलिसांच्या गळाला लागला आणि भ्रष्टाचाऱ्यांची एक भली मोठी साखळी पोलिसांनी ताब्यात घेतली. या कारवाईमुळे राज्यातील महसूल विभागात मोठा भूकंप झाला असून, शेतकऱ्यांच्या नावावर डल्ला मारणाऱ्या इतर 'पांढरपेशी' गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. अशाच एका तक्रारीतून वाशिम जिल्ह्यातील निद्रिस्त असलेला भ्रष्टाचाराचा 'ज्वालामुखी' लवकरच जागृत होणार असल्याचे बोलले जात आहे.

## थोडक्यात

### शेगावीच्या राणाचा मोठ्या उत्साहात मंगरूळनाथ तालुक्यात प्रगट दिन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरुनाथ तालुक्यात प्रत्येक गावात व शहरातील प्रत्येक वर्गात शेगावीचा राणा गजानन महाराजांच्या ताणप्रतिष्ठा व काही ठिकाणी फोटो फ्रेम करून दर गुरुवारी आरती होत असून त्याच ठिकाणी भाविकांना प्रसाद सुद्धा वाटप करण्यात येतो.

दि,८ फेब्रुवारी रोजी खेड्यापाड्या सह शहरात मोठ्या उत्साहात गजानन महाराज प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून यावेळी जागोजागी भाविक भक्तांना अन्नदान करण्यात आले. तर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या महाप्रसादाचा लाखो भाविकांनी आस्वाद घेतला संस्थांचे अध्यक्ष व त्यांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात प्रकट दिन साजरा केला

### फेब्रुवारीला विभागीय लोकशाही दिन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे करण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील सामान्य नागरीकांनी तसेच महिलांनी त्यांच्या विभागीय लोकशाही दिनामधील व महिला लोकशाही दिनामधील तक्रार अर्ज तालुका व जिल्हा लोकशाही दिनात सादर केल्यानंतर विहीत नमुन्यात लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे.

तसेच सदर तक्रार dcgamravati@gmail.com/ dcg_amravati @rediffmail. com या ई-मेलवर विहीत नमुन्यात पाठवावे. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले आहे.

### पिण्याच्या पाण्याच्या टँकर पुरवठ्यासाठी ई-निविदा आमंत्रित

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावे, वाड्या, तांडे तसेच नागरी भागात आवश्यकतेनुसार खाजगी टँकरद्वारे




पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने इच्छुक कंत्राटदारांकडून एक वर्ष कालावधीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामासाठी ऑनलाईन निविदा व फॉर्मची किंमत प्रति निविदा रुपये पाच हजार असून बयाना रक्कम रुपये एक लक्ष इतकी ठेवण्यात आली आहे. तसेच सुरक्षा ठेव म्हणून रुपये पाच लक्षांची राष्ट्रीयकृत बँकेची ग्यारंटी किंवा एफ.डी.आर. निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक आहे. ई-निविदा विक्री व डाऊनलोड करण्याची प्रक्रिया दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. निविदा ऑनलाईन भरण्याची अंतिम मुदत ही ११ फेब्रुवारी २०२६ सायं. ५ वाजेपर्यंत आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, वाशिम यांनी राखून ठेवले असून निविदेसंदर्भातील न्यायालयीन कार्यकक्षा वाशिम जिल्ह्यापुरती मर्यादित राहील, असे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी कळविले आहे.

## तऱ्हाळा-पांगरी रोडची दुर्दशा, ठेकेदार सुस्त, अधिकारी मस्त !

### भ्रष्ट ठेकेदार व अधिकाऱ्यांच्याविरोधात आक्रमक झाले ग्रामस्थ

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●





तऱ्हाळा ते पांगरी महादेव (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) हा सुमारे ४.३० किलोमीटर लांबीचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून दयनीय अवस्थेत आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या कष्टाने, सातत्याने पाठपुरावा करून अखेर शासनाकडून मंजुरी मिळवली. मात्र मंजुरीनंतरही प्रत्यक्ष कामात ठेकेदारांची हलगर्जी आणि अधिकाऱ्यांची उदासीनता यामुळे रस्त्याची अवस्था 'आगीतून फुफाट्यात' अशीच असल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या माध्यमातून पॅकेज क्र. ऊॅ-ऍ-०३४ (वर्ष २०२४-२५) अंतर्गत तऱ्हाळा ते पांगरी रस्त्याच्या सुधारणा (ऊशऊ) कामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या कामाची किंमत ५११.९१ लक्ष रुपये असून कंत्राट ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी, हरदा (म.प्र.) यांना देण्यात आले आहे. काम सुरू करण्याची तारीख १४ ऑक्टोबर २०२४ असून पूर्णत्वाची मुदत १३ ऑक्टोबर २०२६ आहे. मात्र टेंडर प्रक्रिया होऊन दीड वर्षाहून अधिक कालावधी लोटूनही प्रत्यक्ष काम अत्यंत संथ, निकृष्ट दर्जाचे आणि वेळकाढूपणाचे असल्याचा आरोप ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते करत आहेत. ठेकेदार कामाकडे गांभीर्याने पाहत नसल्याने ग्रामस्थांचा संयम सुटत चालला आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते किशोर देशमुख यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन फोटो, व्हिडिओ चित्रीकरण करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना वास्तव परिस्थिती कळवली. तत्कालीन जिल्हाधिकारी भुवनेश्वर मॅडम यांनीही परिस्थितीची दखल घेत अमरावती येथील अधीक्षक अभियंत्यांशी संपर्क साधल्याने काम सुरू झाले, मात्र त्यानंतरही कामाच्या दर्जात कोणतीही सुधारणा झालेली नाही. गावकऱ्यांनी ठेकेदाराला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. कोणताही अडथळा येऊ नये याची जबाबदारीही त्यांनी घेतली. तरीही ठेकेदाराने कामात हलगर्जीपणा, दर्जाहीन साहित्याचा वापर आणि विलंब सुरूच ठेवल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांनाही नीट चालता येत नाही, ही अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे. दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी गावातील ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त वनाधिकारी श्री. धामणकर यांच्या अंत्यविधीवेळी नागरिकांना या रस्त्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. ही घटना ऐकून उपस्थितांचे मन सुन्न झाले. 'जिवंतपणी रस्ता नाही आणि मृत्यूनंतरही सन्मानाने अंत्ययात्रा नेता येत नाही,' अशी भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

'लातों के भूत बातों से नहीं मानते' ही म्हण या ठिकाणी तंतोतंत लागू होत असल्याचे बोलले जात आहे. जर लवकरात लवकर या रस्त्याच्या कामाचा दर्जा सुधारून वेगाने काम पूर्ण झाले नाही, तर ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## गण गण गणात बोतेच्या गजरात ग्राम उंबरवाडी येथे भव्य महाप्रसाद

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●



मालेगांव तालुक्यातील मेडशी नाजिक असलेले अतिशय छोटस व आदिवासीं बहुल गाव उंबरवाडी येथे गेल्या दशकापासून श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त भव्य महाप्रसादचे आयोजन सर्व पंचक्रोशितील गजानन महाराज भक्ता कडून मोठ्या उत्साहाने करण्यात येत असते. या वर्षी ८ फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकटदिन आहे. माघ वद्य सप्तमी म्हणजे २३ फेब्रुवारी १८७८ रोजी बुलडाणा येथील शेगाव येथे गजानन महाराज दिगंबर अवस्थेत लोकांच्या दृष्टीस पडले. तेव्हा पासून ह्या दिवशी प्रगटदीन महाराष्ट्रात प्रत्येक गावागावात साजरा केला जातो.

यावेळेस २१ क्विंटलचा भव्य महाप्रसाद बनवण्यात आला होता या मध्ये प्रामुख्याने पुरी, भाजी, बुंदीचा समावेश होता. परिसरातील भक्ताची या महाप्रसादाला या वेळेस हजारोच्या संख्येने उपस्थिती लावली होती. या वेळी महिला स्वयंसेवकानी स्वयस्पूर्तीने महिलांना महाप्रसादचे वाटप केला. तर ह्या महाप्रसादाचे आयोजन श्री साई गजानन महाराज संस्थान उंबरवाडीच्या वतीने मोठ्या उत्साहाने करण्यात येत असते.

## रेखाताई राष्ट्रीय विद्यालयात 'सप्तशक्ती संगम' कार्यक्रम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



विद्याभारती विदर्भ प्रांतांतर्गत रेखाताई राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रेखाताई राष्ट्रीय कॉन्व्हेंट तसेच सरस्वती शिशु वाटिका, वाशिम येथे 'सप्तशनक्ती संगम' या प्रेरणादायी कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. महिलांच्या सन्मान, सक्षमीकरण व सामाजिक भूमिकेवर प्रकाश टाकणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजलीताई पाठक होत्या. तर ताराताई हातवळणे व सोनलताई राजनकर यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित महिलांना मोलाचे विचार दिले. प्रेरणादायी संदेश ढोले मॅडम यांनी दिला. तसेच अर्चनाताई मगर (माजी नगरसेविका, वाशिम) यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात कु. मनस्वी खडसे हिने सादर केलेल्या नवयुग गीताने झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. 'सप्तशक्ती संगम हा महिलांचा सन्मान करणारा दिवस आहे' असे मत मान्यवरांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंचशील विद्यालंकार शिक्षण संस्थेच्या सचिव कु. लुंबिनीताई कांबळे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन जाधव मॅडम यांनी केले. या प्रसंगी डॉ. ताराताई हातवळणे (विद्याभारती प्रांत कार्यकारी सदस्य), सौ. गिरीजाताई कानडे (शिशु वाटिका जिल्हा संयोजक, अकोला), अंजलीताई पाठक, सौ. अर्चनाताई कांबळे यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नारी शक्तींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये रोशनी ठोके मॅडम (रेल्वे पोलीस, वाशिम), संगीता ढोले मॅडम (महाराष्ट्र पोलीस – वेटलिफ्टिंग गोल्ड मेडल), अर्चना मगर मॅडम (माजी नगरसेविका), सौ. प्रमिलाताई पवार (सावरगाव) यांचा समावेश होता.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पंचशील विद्यालंकार शिक्षण संस्था, वाशिमचे अध्यक्ष मा. अॅड. सत्यानंदभाऊ कांबळे, सचिव कु. लुंबिनीताई कांबळे, संचालिका सौ. अर्चनाताई कांबळे, प्राचार्य श्री रमेश आरू सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## रिठद येथील संत गजानन महाराजांचा... प्रगटदिन झाला लोकोत्सव !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



तालुक्यातील रिठद येथील संत गजानन महाराज मंदिरद्वारा संत गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त भव्यदिव्य महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. प्रगटदिनाच्या दिवशी सकाळी काल्याचे किर्तन सकाळी १०.३०. सुरु होऊन दु.१२ वा. महाप्रसादाचे वितरणास शांतीपूरी बाबा यांचे हस्ते या महाप्रसाद वितरणाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी या पंचक्रोशीतील व वाशिम, अकोला, बुलढाणा, हिंगोली जिल्ह्यातील अनेक भक्तांनी या महाप्रदाचे वितरण होण्यापूर्वी संत गजानन महाराजांच्या मंदितातील मूर्ती चे दर्शन घेऊन प्रसादाचे सेवन केले. यामध्ये महिलांची संख्या पूरुषापेक्षा अधिक होती. यात्रेचे भव्य स्वरूप पाहता ग्रामीण पोलीस स्टेशन वाशिम यांच्याकडून चांगला बंदोबस्त होता. ठाणेदार श्रीदेवी चव्हाण यांनी प्रत्यक्ष हजर राहून कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही. तसेच या महाप्रसादाच्या सेवनासाठी जिल्ह्यातील सर्वच राजकीय, प्रतिष्ठीत मंडळींनी दर्शन घेऊन महाप्रसादाचे घेतला.

या महाप्रसादाचे वितरणासाठी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील भोसा, भिवापूर, लोणी (गवळी), रिसोड तालुक्यातील कवठा, आसेगावपेन वाशिम तालुक्यातील जुमडा, सावरगाव (जिरे), अटकळी, मालेगाव तालुक्यातील शिरसाळा इत्यादी गावातील महिलांनी भक्तांचे सेवेसाठी दिवसभर प्रसादाचे वितरण करण्याचा भाग होऊन कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. याबद्दल त्यांना साडी-चोळीचे वाटप मंदीर समितीचे वतीने करण्यात आले. यासाठी अनेक दात्यांनी त्यासाठी मदत केली. व समीतीने सेवेकरी भक्त गणाचे आभार मानत व सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. या भव्यदिव्य महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तांनी घेतला.

## श्री संत बिरबलनाथ महाराज यात्रा महोत्सवानिमित्त विदर्भ स्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचे उद्घाटन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगळवेढा येथील तपस्वी संत बिरबलनाथ, महाराज यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून दि. ८ फेब्रुवारी रोजी संत शिरोमणी अच्युत महाराज यांचे प्रमुख उपस्थितीत माजी लोकनेते सुभाषराव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली भव्य विदर्भस्तरीय खंजिरी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आमदार श्याम भाऊ खोडे यांच्या हस्ते तर विशेष संस्थानचे प्रमुख सचिन महाराज देव हे उपस्थित होते. बिरबलनाथ महाराज संस्थानचे सचिव रामकुमार रघुवंशी व कृष्णा भैया रघुवंशी यांनी चांगल्या प्रकारे यात्रा महोत्सवामध्ये व्यवस्थापन केले. यावेळी माजी जि. प. अध्यक्ष चंद्रकांत दादा ठाकरे, नगराध्यक्ष अशोक भाऊ परळीकर, वाशिम जिल्हा श्री गुरुदेव सेवामंडळ प्रचारक विनोद पाटील जाधव, नगरपरिषद उपाध्यक्ष अनिल भाऊ गावंडे, नगरसेवक प्रा. वीरेंद्रसिंह ठाकूर सर, खरेदी विक्री उपाध्यक्ष नारायणराव बारड, माजी सभापती भास्कर पाटील शेगीकर, माजी प.स. सभापती बाबू आप्पा गोंडाळ, श्री गुरुदेव आजीवन प्रचारक रवीभाऊ वार्डेकर, माजी जि.प. सदस्य दौलतराव इंगोले गणेश मते सह मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये पार पडलेल्या स्पर्धेमध्ये २३ पुरुषांचे व ११ महिला संघाने भाग घेतला होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात श्री तिरुपती बालाजी प्रकटोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

## श्रावगी टावर परिसरात भाविकांची अलोट गर्दी; महाप्रसादाने झाली सांगता





प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** येथील टिळक रोडवरील श्रावगी टावर स्थित श्री तिरुपती बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रकटोत्सव सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. सलग २९ वर्षांची परंपरा असलेल्या या महोत्सवात गेल्या तीन दिवसांपासून विविध धार्मिक विधी, भजन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

उत्सवाची सुरुवात शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता 'सुप्रभात मंडळ' आणि 'भजन राधे कृपा' यांच्या सुश्राव्य भजनांनी झाली. भक्तीगीतांच्या सुरावटींनी संपूर्ण मंदिर परिसर मंत्रमुग्ध झाला होता. रविवार, ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि शहराच्या कल्याणासाठी 'यज्ञ आहुती' देण्यात आली. सायंकाळी ७ वाजता देवाची भव्य महाआरती करण्यात आली. या दिवशीचे मुख्य आकर्षण म्हणजे 'छप्पन भोग' सजावट. श्री बालाजींच्या मनमोहक रूपाचे आणि त्यांना अर्पण केलेल्या छप्पन भोगाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. श्री तिरुपती बालाजी मंदिर ट्रस्ट, अकोला यांच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी दर्शनाची आणि प्रसादाची चोख व्यवस्था करण्यात आली होती. शिस्तबद्ध नियोजन आणि भाविकांच्या श्रद्धेमुळे हा प्रकटोत्सव पुन्हा एकदा अकोल्याच्या धार्मिक परंपरेतील एक अविस्मरणीय सोहळा ठरला आहे. शहरातील टिळक रोडवरील श्रावगी टावर येथे असलेल्या श्री तिरुपती बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही 'प्रकटोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. श्री तिरुपती बालाजी मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित या तीन दिवसीय सोहळ्यात विविध धार्मिक विधी आणि भजनांचे आयोजन करण्यात आले आहे.

### फुलांची आकर्षक सजावट आणि रोषणाई

प्रकटोत्सवानिमित्त मंदिर परिसराला गुलाब, झेंडू आणि विविध प्रकारच्या रंगीबेरंगी नैसर्गिक फुलांनी सजवण्यात आले होते. रात्रीच्या वेळी करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईमुळे श्रावगी टावर परिसराला एका दिव्य नगरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. गर्भगृह आणि सभामंडपातील फुलांची सजावट भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली.

### महाप्रसादाने सांगता

सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता यज्ञ पूर्णाहुती देऊन धार्मिक विधींची सांगता झाली. त्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्रावगी टावर परिसरात आयोजित या भंडाऱ्यात शेकडो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

# सणासुदीपूर्वीच किराण्याला भाववाढीचा तडका

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** आगामी सणापूर्वीच शेंगदाणे, खाद्य तेल, तूरडाळ व मसाल्याच्या दरात वाढ झालेली दिसते.

त्याचा परिणाम किचन बजेटवर झालेला दिसतो. शेंगदाणे १७० ते १८० रूपये किलो, सरकी तेल १६० रू., सोयाबीन तेल १४५ रू. लिटर, तूर डाळ १४० ते १५० रुपयापर्यंत पोहोचले. खोबरेल तेलाचे भाव तर बरेच वाढले आहे. जे पाऊच ३२ रूपयांना मिळत होते ते ५० रुपयाला घ्यावे लागत आहे. मसाला पदार्थ देखील चढ्या दराने घ्यावे लागत आहेत.

एकीकडे लग्न सराईचे दिवस सुरू झाले आहेत. आणि त्याचवेळी किराणा मालाचे दर वाढल्याने त्याचा बोजा सामान्य ग्राहकांवर मोठ्या प्रमाणात पडत आहेत. पुढे महाशिवरात्री, रमजान ईद, होळी आहे. त्यामुळे खरेदीदारांना जादा पैसे मोजून वस्तू खरेदी करण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही.

# परीक्षेतील कथित गैरप्रकारांना आळा बसेल का?

## दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त घोषणेला आव्हान

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**अकोला :** दहावी बारावीच्या परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने कठोर नियम लागू केले असले तरी अकोला जिल्ह्यातील काही परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार होतात. कॉपीमुक्त अभियानाला यावेळी तरी आळा बसेल का अशी विचारणा होत आहे.

नियमानुसार एका गावात किंवा शहरात एकापेक्षा जास्त केंद्रे असल्यास विद्यार्थ्यांची सरमिसळ करून इतर शाळेत परीक्षा देण्याची व्यवस्था केली जाते, जेणेकरून कॉपीसारख्या गैरप्रकारांना आळा बसेल. मात्र काही ठिकाणी या नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसते.

जिल्ह्यातील काही शाळांना थेट स्वतःच्याच विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्र देण्यात आल्याने अदलाबदल न करता त्याच शाळेत परीक्षा घेतली गेल्याचे दबक्या आवाजात सांगितले जाते. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे.

विनाअनुदानित शाळांमध्ये कॉपीचे प्रकार खुलेआम सुरू असल्याचा आरोप पालक व शिक्षकांकडून करण्यात येत आहे, अशा प्रकारांची शिक्षण व जिल्हा प्रशासन व्यवस्थेने शहानिशा करणे आवयक आहे. दरम्यान शिक्षण क्षेत्रातील वाढत्या व्यापारीकरणामुळे अशा गैरप्रकारांची संख्या वाढली असण्याची शक्यता आहे.

काही शाळांमध्ये 'कॉपी सुविधा उपलब्ध असल्याचे सांगून जास्तीत जास्त पैसे घेऊन प्रवेश दिले जात असल्याची चर्चा आहे. या पैशांचा वापर परीक्षा काळात येणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रभाव टाकण्यासाठी केला जातो, असा आरोपही होतो. परिणामी प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या नियमानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य असतानाही अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी दिसून येत नाही. काही केंद्रांवर स्पीकरद्वारे उत्तरे सांगितली जात असल्याची बाब काही समाजसेवकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले आहे. अशा स्थितीत जिल्हाधिकारी व शिक्षण विभागाने गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पुढाकार घ्यावा जेणेकरून प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याकडे लक्ष दिले पाहिजे.

# बीजीई सोसायटीच्या अध्यक्षपदी ॲड. मोतीसिंह मोहता यांची फेरनिवड

## कार्यकारी मंडळात डॉ. हेडा पॅनलचे वर्चस्व



### अध्यक्षपदासाठी ॲड. मोहता, डॉ. हेडा यांच्यात लढत

बीजीई सोसायटीच्या अध्यक्षपदी निवडून आलेले ॲड. मोतीसिंह मोहता यांना १४१ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी डॉ. राजकुमार हेडा यांना ११८ मते प्राप्त झाली. अध्यक्षपदी ॲड. मोतीसिंह मोहता यांची निवड जाहीर करण्यात आली. ॲड. मोहता यांच्या समर्थकांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** अकोला आणि वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील गणमान्य बीजीई सोसायटीच्या अध्यक्षपदी ॲड. मोतीसिंग मोहता यांची फेरनिवड झाली.

संचालकपदासाठी रविवारी मतदानानंतर रात्री उशिरापर्यंत मतमोजणी चालली. या निवडणुकीत डॉ. आर. बी. हेडा यांच्या पॅनलचे १२ पैकी ११ सदस्य निवडून आले. मात्र, संस्थेच्या अध्यक्षपदावर ॲड. मोतीसिंह मोहता यांनी विजय मिळविला. मोहता पॅनलचे कनिष्ठ उपाध्यक्ष अभिजित परांजपे आणि कार्यकारी सदस्यपदी करण चिमा यांची निवड झाली. कार्यकारी सदस्य मंडळात विद्याविकास पॅनलने बाजी मारली असली, तरी पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदारांनी ज्ञानगंगा पॅनलवर विश्वास दाखवला.

रविवारी पार पडलेल्या मतदानात एकूण ३१९ पैकी २६१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळी ८.३० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत मतदान झाले. सायंकाळी आरएलटी महाविद्यालयात मतमोजणीला प्रारंभ झाला.

अध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, ज्येष्ठ उपाध्यक्ष, कनिष्ठ उपाध्यक्ष, मानद सचिव, सहसचिव या पाच पदाधिकाऱ्यांसह १२ सदस्य अशा १७ जागांसाठी निवडणूक घेण्यात आली.

मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर अगोदर १२ कार्यकारिणी सदस्यांची मते मोजण्यात आली. यामध्ये ललित अग्रवाल (१४५), श्रीकृष्ण अमरावतीकर (१६०), ॲड. संजय अटल (१८९), अभय बिजवे (१५३), मनोज बिसेन (१७१), आनंद चांडक (१४३), करण चिमा (१७८), गोविंद कागलीवाल (१४५), डॉ. अजय कांत (१७९), राहुल महाजन (१५८), ॲड. सुशीलकुमार शर्मा (१४४) आणि नरेंद्र बाहेती (१४२) निवडून आले. कार्यकारिणी सदस्यांची मतमोजणी आटोपल्यानंतर रात्री ११.३० वाजता अन्य पदाधिकाऱ्यांची मतमोजणी सुरू झाली. यामध्ये ज्येष्ठ उपाध्यक्षपदी विजय तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्षपदी अभिजीत परांजपे (१४०), मानद सचिवपदी पवन माहेश्वरी, सहसचिवपदी अमित सुरेका (१६३) विजयी झाले. सर्वात शेवटी अध्यक्षपदासाठी मतमोजणी झाली. डॉ. आर. बी. हेडा आणि ॲड. मोतीसिंह मोहता यांच्यात चुरशीची लढत झाली. ॲड. मोतीसिंह मोहता यांनी बाजी मारली. या निवडणुकीत पदाधिकारी गटात ज्येष्ठ उपाध्यक्ष-विजय तोष्णीवाल, मानद सचिव पवन माहेश्वरी यांची अविरोध निवड झाली. रात्री उशिरापर्यंत मतमोजणी चालली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. उल्हास कवीश्वर यांनी काम पाहिले.

# ४० आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार !

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभदिला जाणार आहे.

# वन्यप्राण्यांचा रब्बी पिकांवर हल्ला

## शेतकरी विवंचनेत, पिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील विराहित परिसरातील अनेक गावांमध्ये तसेच जंगलालगतच्या शेतांमध्ये रानडुक्कर व नीलगाय यांसारख्या वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणात धुडगूस सुरू असून, शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे.

वन्यप्राणी अन्नाच्या शोधात रात्री शेतांमध्ये घुसून कापूस, हरभरा तसेच काढणीस आलेल्या उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस करीत आहेत. विशेषतः रानडुक्कर रात्रीच्या वेळी टोळ्यांनी शेतात शिरून पिके उद्ध्वस्त करीत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दिवसभर शेतात मेहनत करूनही रात्री पिकांचे नुकसान करीत आहेत.

डुक्कर, नीलगाय, हरिण, वानर आदी वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे रात्री-अपरात्री शेतीची रखवाली करूनही पिकांचे नुकसान होत आहे. शासनाने सर्व शेतकऱ्यांना तारेचे कुंपण अनुदानावर उपलब्ध करून द्यावे. संरक्षणासाठी जागरण करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. उभी पिके डोळ्यादेखत नष्ट होत आहेत.

वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे त्रस्त झालेल्या शेतक-यांच्या हितासाठी प्रशासनाने तातडीने रानडुकरांचा बंदोबस्त करावा, नुकसानीची पाहणी करून योग्य भरपाई द्यावी व या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. डुकरांच्या वाढत्या उपद्रवामुळे अनेक शेतकऱ्यांनी ज्वारी पिकाची पेरणीच बंद केली असल्याचे चित्र आहे. सततच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

# १९ वर्षीय तरुणी बेपत्ता

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**तेल्हारा:** तालुक्यातील एका गावातील १९ वर्षीय तरूणी ६ फेब्रुवारीला सकाळी ११.३० वाजेपासून बेपत्ता झाल्याप्रकरणी तरुणीच्या पित्याने तेल्हारा पोलिसात ८ फेब्रुवारी रोजी तक्रार नोंदविली आहे.

# यात्रेमधून मोटरसायकलची चोरी

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**पातूर:** दिग्रस येथील सोपीनाथ महाराज यात्रेमधून भर दिवसा मोटर सायकल चोरी झाली. पातुर तालुक्यामध्ये चोरीचे खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची नागरिक मागणी करत आहेत.

चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत ग्राम डिग्रस येथे सोपीनाथ महाराज यांचे दर्शनाकरिता देऊळगाव येथील संजय विश्वनाथ बराटे गेले होते. त्यांनी त्यांची एमएच ३० बी एम ५८१२ क्रमांकाची मोटार सायकल ६ /२ २०२६ ला संध्याकाळी मंदिराजवळच मंगल कार्यालयाच्या भिंतीजवळ लावून दर्शनासाठी गेले. दर्शन करून परत आल्यानंतर त्यांना त्यांची लावलेल्या जागी मोटरसायकल दिसली नसल्यामुळे त्यांनी मोटरसायकलचा शोध घेतला मात्र गाडी कुठेच मिळून आली नसल्याने त्यांनी पोलीस स्टेशन मध्ये जाऊन तक्रार दिली असता चान्नी पोलिसांनी कलम ३०३ (२) बी एन एस नुसार गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास चान्नी पोलीस करत आहेत.

# गांधीजींच्या अस्थींच्या साक्षीने उभ्या राहिलेल्या गांधीग्रामला पर्यटन स्थळ घोषित करा

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी



**अकोला:** महात्मा गांधीजींच्या अस्थिविसर्जनाचे साक्ष असलेल्या गांधीग्राम गावाला शासनाने पर्यटन स्थळाचा दर्जा द्यावा अशी मागणी ग्रामस्थ, ग्रामपंचायत, अकोला जिल्हा सर्वोदय मंडळ व गावातील हरिपाठ मंडळाच्या वतीने करण्यात आली.

राष्ट्रपित्याच्या निधनानंतर सीपी अँड बेरारचे तत्कालीन मंत्री ब्रिजलालजी बियाणी, लोकनेते डॉ. आबासाहेब खेडकर, नानासाहेब सपकाळ यांच्या पुढाकाराने महात्मा गांधीजींच्या अस्थिकलशाचे विसर्जन वाघोली येथील पूर्णा नदी घाटावर करण्यात आले.

ही घटना केवळ स्थानिक नव्हे तर राष्ट्रीय इतिहासाचा महत्त्वाचा अध्याय ठरली आहे. या ऐतिहासिक स्मृती जपण्यासाठी गांधीग्राम येथे १२ फेब्रुवारीला अस्थिविसर्जन स्मृती पर्व साजरे केले जाते. यानिमित्त पूर्णा नदी घाटावर गंगापूजन - सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन केले जाते. महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयात झुणका भाकरीचे स्नेहभोजन दिले जाते व राष्ट्रीय गीत गायनाने गांधीजींचे भजने सादर केली जातात. या ऐतिहासिक व वैचारिक वारशाला शासन मान्यता मिळावी या उद्देशाने ३० जानेवारीला महात्माजींच्या शहीद दिनी गांधीग्राम येथे महत्व पूर्ण बैठक पार पडली. परिसर सफाई करून गांधीजींच्या पुतळ्यास सुतमाला व पुष्प अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड, माजी जिल्हा परिषद सदस्य भाई प्रदीप देशमुख, हरिपाठ मंडळाचे गणेशराव अढाऊ, सरपंच शरद ठाकरे, सुखदेवराव अढाऊ, विजय मोडक, प्रकाश काठोळे, विवेक मेतकर, गणेश मांजरे, डॉ. अतुल काठोळे, प्राचार्य प्रफुल डोंगरे, विश्वास काठोळे, सुभाष ठाकरे, संजय मांजरे, प्रा. डॉ. विजय चव्हाण, प्रा. जगन्नाथ बरडे, अनिल राऊत, प्रा. पूजा ठाकरे, प्रा. मोक्षदा इंगोले यांच्यासह पंचक्रोशीतील सर्वोदयी कार्यकर्ते, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# वाहन डिलर आस्थापनेत ५.६४ लाखांचा अपहार

प्रतिनिधी ९ फेब्रुवारी

**अकोला:** शिवणी येथील ऑटोमोबाईल डिलर गद्रे ऑटोकॉन येथे कर्मचाऱ्यांकडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वाशिम शाखेतील व्यवस्थापक पंकज सरदार यांच्यासह सहा कर्मचाऱ्यांनी संगनमताने सुमारे पाच लाख ६४ हजार ८९९ रुपयांचा पार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला ३ फेब्रुवारी रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल गद्रे यांच्या पत्नीने पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार वाशिम शाखेचे व्यवस्थापक पंकज सरदार यांच्यासह अतुल अवचार, राहुल लांडगे, पीयूष चौधरी, विजय कंकाळ आणि मीनाक्षी चौरपगार हिवराळे यांनी ग्राहकांकडून प्राप्त झालेली रक्कम कंपनीच्या अधिकृत खात्यात न भरता ती स्वतःच्या किंवा खाजगी खात्यांमध्ये वळवल्याचा आरोप आहे. अंतर्गत लेखा परीक्षणात सुमारे पाच लाख २९ हजार ८९९ रुपयांचा अपहार झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक दयाराम राठोड तपास करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135